शिवपुत्र संभाजी राजे महानाट्य

स्वराज्याचे रक्षणकर्ता



लेखक: मनोज शेडगे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

शिवपुत्र संभाजीराजे

(नाटक)

(द्वितीय आवृत्ती)

प्राचार्य मनोज शेडगे

शिवपुत्र संभाजीराजे(नाटक) (द्वितीय आवृत्ती)

लेखक: प्राचार्य मनोज शेडगे

२६७/३६, दुर्वांकुर, जानकीनगर, उचगाव

ता. करवीर, जि. कोल्हापूर

मूळ गाव : शिवापूर (ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग)

संपर्क : ८४२१०३८५११ / ७५८८१४४२३२

ई-मेल : svm.manojshedge@gmail.com

मुखपृष्ठ व पुस्तक निर्मिती सहाय्य- अंजना लगस

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ६ जून २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २२०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- प्राचार्य मनोज शेडगे - ८४२१०३८५११

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

श्री. मनोज सखाराम शेडगे

(एम.ए., बी.एड.)

समर्थ विद्या मंदिर व समर्थ विद्यालय, कोल्हापूर येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले श्री. मनोज शेडगे हे उपक्रमशील व विद्यार्थीप्रिय शिक्षक आहेत. अध्यापनाबरोबरच साहित्य, संगीत, खेळ आणि रंगभूमी यांविषयी त्यांना विशेष ओढ आहे.

त्यांनी 'मनात' हा कविता संग्रह लिहिला असून 'शिवपुत्र संभाजीराजे' या ऐतिहासिक नाटकाचे लेखन व दिग्दर्शन केले आहे. सध्या 'मराठ्शाहीचा उदय' या नव्या पुस्तकावर त्यांचे लेखन सुरू आहे.

ऐतिहासिक विषयांवरील वाचनाची त्यांना विशेष आवड आहे. नाटक पाहणे, गायन करणे आणि हार्मोनियमवर अभंग व गवळणी वाजवणे हे त्यांचे आवडते छंद आहेत. कोरोना काळात त्यांनी विविध संतांचे सुमारे १०० अभंग, ३५ गवळणी आणि १५ भारूड यांचे संकलन करून हार्मोनियमवर विविध रागांत सादर करण्याचा सराव केला आहे. त्यांना हिंदी जुनी गाणी व नाट्यसंगीताचीही विशेष आवड आहे.

कविता लेखन व वाचन हे त्यांचे जिव्हाळ्याचे क्षेत्र असून आजपर्यंत त्यांनी सुमारे बऱ्याच कविता लिहिल्या आहेत. कृष्णराव अर्जुन केळुसकर 'शिवचरित्र' डॉ.जयसिंगराव पवार, कमल गोखले 'शिवपुत्र संभाजी, छत्रपती संभाजी महाराज,' वा.सी.बेंद्रे 'शिवाजी महाराज यांचे खरे चरित्र' मनु एस पिल्लाई, विश्वास पाटील, शिवाजी सावंत, रणजीत देसाई यांचे 'श्रीमान योगी', बाबासाहेब पुरंदरे यांचे 'राजा शिवछत्रपती', तसेच पु. ल. देशपांडे, आदित्य निघोट अशा अनेक साहित्यिकांची पुस्तके वाचली आहेत.

वाचनाची आवड जोपासत त्यांनी स्वतःच्या खर्चाने सुमारे ५०० हून अधिक पुस्तकांचे छोटेसे वाचनालय उभारले आहे. त्याचबरोबर अच्युत गोडबोले यांचे *'मनात'*, *'यांनी घडवले सहस्त्रक'*, विनायक डांके यांचे *'नेपोलियन दि ग्रेट'*, तसेच आचार्य अत्रे यांचे *'मी कसा झालो'* यांसारखी अनेक पुस्तके त्यांनी अभ्यासपूर्वक वाचली आहेत.

दोन शब्द...

"शिवपुत्र संभाजीराजे" हे माझे पहिले नाट्यपुष्प इतिहासप्रेमी रसिकांसमोर ठेवताना मला अत्यंत आनंद होत आहे. या नाट्यप्रयोगातून स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी राजे यांचा महापराक्रम अनुभवायला मिळेल.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर सारा हिंदुस्तान जिंकण्याच्या आशेने दक्षिणेत पाच लाख सैन्य घेऊन स्वराज्यावर चालून आलेल्या औरंगजेबास तब्बल नऊ वर्षे झुलवत ठेवणारा पराक्रमी संभाजी तुम्हाला येथे दिसेल. त्या काळात सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांत घोड्यांच्या टापा घुमत होत्या; पण स्वार्थ आणि क्षणिक सुखासाठी काही आप्तस्वकीय दूर गेले, फितुरीचे डाव रचले गेले. तरीही शिवपुत्र संभाजीराजे साऱ्यांना पुरून उरले. हा इतिहास वाचताना अंगावर रोमांच उभे राहिल्यावाचून राहणार नाहीत.

"शिवपुत्र संभाजीराजे" या तीन अंकी नाट्यप्रयोगातून संभाजी महाराजांचा धगधगता इतिहास अनुभवता येईल, याबद्दल मला पूर्ण खात्री आहे.

माझी मनापासून इच्छा आहे की हे नाटक व्यावसायिक रंगमंचावर यावे आणि साऱ्या जगाला कळावे—माझा राजा कसा होता! तो प्रजेचा बाप होता, धर्मवीर योद्धा होता आणि हिंदवी स्वराज्याचा अचल रक्षक होता.

बालपणापासून गावातील शिवजयंती व शिवमहोत्सवात सादर होणारी नाटके पाहून आपणही एखाद्या मावळ्याची भूमिका करावी, अशी इच्छा होती; परंतु दिव्यांगत्वामुळे ते शक्य झाले नाही. मात्र हे नाटक आपल्या हाती देताना ती अपूर्ण इच्छा पूर्ण झाल्याचा आनंद मी अनुभवत आहे.

ई-साहित्याचे वाचक हे पुस्तक वाचून आपले अभिप्राय देतील, अशी अपेक्षा आहे.

धन्यवाद!

— लेखक: मनोज शेडगे

प्रास्ताविक

कित्येक दिवस मनाला खंत वाटत होती. मी चौथी इयत्तेत माझ्या जन्मगावी शिवापूर, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथे शिकत होतो. माझा मोठा भाऊ संभाजी हा सातवीत शिवापूरच्या प्राथमिक शाळेत शिकत असताना "राजा संभाजी" हे नाटक त्या वर्गाने वार्षिक स्नेहसंमेलनाला सादर केले होते. साधारण १९८१ सालची ही गोष्ट असावी.

माझ्या भावाने त्यावेळी गणोजी शिर्के, शिवाजी रेंबाळकर यांनी संभाजीची, मारुती गुंजाळ (गुरुजी) यांनी खंडोजीची, कवी कलशची भूमिका गुणाजी गुंजाळ यांनी, तर औरंगजेबाची भूमिका चंद्रकांत राऊळ यांनी साकारली होती. त्या नाट्यप्रयोगात संभाजी राजे व्यसनी दाखवले गेले होते.

मी तेव्हा तिसरी-चौथीत शिकत होतो. वयाने जरी लहान—साधारण दहा वर्षांचा—असलों, तरी रक्त मराठ्याच गडकऱ्याचे असल्याने संभाजी राजांची अशी व्यसनी भूमिका पाहून मी त्या बालवयातही फार दु:खी झालो होतो. माझ्या छत्रपतींचा छावा असा नसावा आणि नसणार, याची मला मनोमन खात्री होती. तो असणार महायोद्धा, रणवीर—वाघाच्या जबड्यात हात घालणारा!

पण कोणत्या लेखकाने हे चुकीचे चित्रण केले आणि का? हा प्रश्न मला अनेक वर्षे सतावत राहिला. तेव्हाच मी ठरवले होते की, सत्य काय आहे ते जगासमोर मांडायचे. आज नाही तर उद्या खरा इतिहास लोकांसमोर आणायचाच. माझ्या शिवपुत्र संभाजीराजांची झालेली बदनामी आता सहन होणार नव्हती.

या निर्धाराने मी अनेक इतिहासकारांनी लिहिलेल्या पुस्तकांचा सखोल अभ्यास सुरू केला. विशेषतः विश्वास पाटील यांच्या 'संभाजी' या कादंबरीचा अभ्यास केला. आणि त्यातूनच माझ्या जीवनातील पहिलेवहिले "शिवपुत्र संभाजीराजे" हे तीन अंकी नाटक मी रसिकांच्या सेवेत सादर करत आहे.

आज, दि. १९ फेब्रुवारी २०१७ रोजी, 'शिवजयंती'च्या शुभ मुहूर्तावर हे नाटक रसिकांच्या स्वाधीन करताना मला अतिशय आनंद होत आहे; पण त्याचवेळी मनही भरून येत आहे. मी दहा वर्षांचा असल्यापासून आज पंचेचाळीस वर्षांचा झालो; तरी गेली पस्तीस वर्षे मनात सलणारी वेदना आज शांत करू शकलो, याचे समाधान मला मनोमन वाटते.

या कामाला सुरुवात केल्यानंतर माझा अपघात झाला. माझा डावा हात पूर्ण निकामी झाला होता. तरीही मी हे पवित्र लेखनकार्य सुरू ठेवले. जवळजवळ चार महिने त्या हाताने काहीच काम करता येत नव्हते. कच्च्या टिपण्या तयार होत्या; पण टायपिंगचे मोठे आव्हान होते.

माझे मन मात्र स्वस्थ बसू देत नव्हते. तेव्हा स्वतःलाच प्रश्न केला—अरे! आपल्या संभाजी राजांनी औरंगजेबाच्या पाच लाखांच्या फौजेला नऊ वर्षे झुंज दिली; तीही अत्यंत कमी साधनांत, प्रतिकूल परिस्थितीत! आणि तू एवढेही करू शकत नाहीस?

छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिवापूर गावाचा गडकरी रहिवासी असलेला मी, त्या प्रेरणेने उभा राहिलो. हाताच्या वेदना विसरून पुन्हा जोमाने कामाला लागलो. ही स्फूर्ती होती संभाजी राजांच्या बलिदानाची, गडकरी बाण्याची आणि माझ्या शिवरायांची. म्हणूनच हे नाट्यपुष्प पूर्ण करू शकलो.

आजही मी सुट्टीच्या निमित्ताने कोकणात शिवापूरला जातो. तेव्हा माझ्या घराच्या अंगणातून दिसणाऱ्या "मनोहर-मन संतोष" गडाकडे एकटक पाहत बसतो. पावसाळ्यात धुक्यात हरवलेला "मनोहर-मन संतोष" आणि दूरवर दिसणारा "रांगणं" शोधणे हे माझ्यासाठी नित्याचेच झाले आहे.

हे नाटक लिहिण्यामागचा प्रामाणिक हेतू असा की, माझ्या राजांचा चुकीचा इतिहास काही लेखकांनी नाटकातून जगासमोर आणला होता. तो दूर करणे आणि सत्य महाराष्ट्राच्या जनतेसमोर मांडणे, एवढेच...

जर संभाजी राजे व्यसनी असते, तर त्यांनी औरंगजेबाच्या पाच लाख सैन्याशी आठ वर्षे लढा दिला असता का? इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच, डच आणि मुघल अशा बलाढ्य शत्रूंशी एकाच वेळी सामना करणे आणि महाराष्ट्राला एकत्र ठेवणे ही सोपी गोष्ट नव्हती.

आशियातील सर्वात मोठी राजसत्ता औरंगजेबाची होती, तर सर्वात लहान माझ्या शंभूची. तरीही त्यांनी दिलेला लढा इतिहासात अद्वितीय आहे.

संभाजी राजांवर बायकांचा नाद असल्याचा खोटा आरोप करण्यात आला. पण तसे असते, तर त्यांनी फक्त दोनच लग्न का केली असती? त्या काळात अनेक लग्न करणे समाजमान्य होते. तरीही त्यांनी संयम पाळला.

अनेक ऐतिहासिक घटनांचा विपर्यास करून खोटा इतिहास मांडण्यात आला. परंतु सत्य वेगळेच आहे. हे सत्य लोकांसमोर आणणे ही आपली जबाबदारी आहे

आज आपण सुज्ञपणे विचार करून आपल्या राजांचा खरा इतिहास जाणून घेतला पाहिजे. तेव्हाच आपण भगवा टिळा लावण्यास पात्र ठरू.

या नाटकात मानवी भाव-भावनांचा विचार करण्यात आला आहे. राजा असला तरी तो एक माणूस असतो—हे लक्षात घेऊन प्रसंग, मानसिकता आणि काळ यांची सांगड घालण्यात आली आहे.

थोडक्यात, संभाजीराजांनी कमी वयात, कमी वेळात आणि कमी साधनांत केलेली महान कामगिरी या नाटकातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

हे नाटक लिहिताना माझ्या पत्नी सौ. मानसी यांनी नोकरी आणि घर सांभाळून मला मोठे सहकार्य केले. तसेच समर्थ विद्या मंदिरच्या ग्रंथपाल आणि ई-साहित्य प्रतिष्ठानच्या 'कानगोष्टी' विभाग प्रमुख कु. अंजना लगस यांनीही नाटक वाचून प्रकाशनासाठी सहकार्य केले.

आमच्या संस्थेच्या उपाध्यक्षा कै. रजनीताई करकरे-देशपांडे आणि सुचित्राताई मोर्डेकर यांनी अभिप्राय देऊन प्रोत्साहन दिले. तसेच ई-साहित्य प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. सुनील सामंत सर यांनी त्वरित प्रकाशनास अनुमती दिली.

ई-साहित्य टीम व सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

"शिवपुत्र संभाजी" हे नाटक प्रत्येक शिवप्रेमी घराघरांत पोहोचावे, त्याचे भव्य प्रयोग गावोगावी सादर व्हावेत आणि नव्या पिढीला खरे शंभूराजे कळावेत—हीच भवानीमातेला कळकळीची प्रार्थना!

धन्यवाद!
आपला विश्वासू,
मनोज शेडगे

दुसऱ्या सुधारित आवृत्तीविषयी...

'शिवपुत्र संभाजी राजे' या महानाट्याची पहिली आवृत्तीदिनांक २५ नोव्हेंबर २०२१ मध्ये रसिकांच्या भेटीला आली आणि अल्पावधीतच वाचकांच्या मनात घर करून गेली. या नाटकाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, रसिकांनी व्यक्त केलेल्या भावना आणि सूचनांनी

मनाला स्पर्श केला आणि याच प्रेरणेतून या महानाट्याची दुसरी, अधिक परिष्कृत आवृत्ती साकारण्याचा निर्धार दृढ झाला.

छत्रपती संभाजी महाराज म्हणजे केवळ एक राजा नव्हे, तर जाज्वल्य स्वाभिमानाचा ज्वालामुखी, धर्मरक्षणासाठी प्राणार्पण करणारा धर्मवीर, आणि हिंदवी स्वराज्याच्या अभेद्य किल्ल्याचा अचल रक्षक! त्यांच्या तेजस्वी, धगधगत्या जीवनप्रवासाचे सत्य रूप जनमानसात अधिक प्रभावीपणे उमटावे, हा या नाटकामागील प्रामाणिक प्रयत्न आहे.

या सुधारित आवृत्तीत कथानकाची बांधणी अधिक नेमकी, संवादांची धार अधिक तीव्र, आणि भाषाशुद्धतेला अधिक परिपूर्णता देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रत्येक प्रसंग रंगभूमीवर सजीव व्हावा, प्रत्येक संवाद प्रेक्षकांच्या अंत:करणाला भिडावा आणि संभाजीराजांचा जाज्वल्य इतिहास पुन्हा एकदा डोळ्यांसमोर उभा राहावा, यासाठी ही नव्याने केलेली मांडणी सादर आहे.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या ३६९ व्या जयंतीचे पावन औचित्य साधत, दिनांक १४ मे २०२६ रोजी ही दुसरी सुधारित आवृत्ती प्रकाशित करताना मन अभिमानाने भरून येते. हे महानाट्य वाचकांच्या हृदयात प्रेरणेची

ज्योत पेटवेल, स्वाभिमान जागवेल आणि स्वराज्यभक्तीची नवी ऊर्जा देईल, अशी दृढ खात्री आहे.

रसिक, वाचक आणि रंगकर्मी यांनी या नाटकाला पूर्वीप्रमाणेच प्रेम द्यावे, रंगभूमीवर साकारावे आणि आपले मौल्यवान अभिप्राय नक्की कळवावेत, ही नम्र अपेक्षा.

मनोज शेडगे

- रसिकांचे अभिप्राय -

छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय शौर्याची जाज्वल्य गाथा या महानाट्यात प्रभावीपणे उभी राहते. प्रजेच्या रक्षणासाठी त्यांनी अनेक शत्रूंना छातीठोकपणे सामोरे जाण्याची पराकाष्ठा प्रेरणादायी आहे. शिवश्री शेडगे सरांचे हे लेखन शिवप्रेमींच्या हृदयात अभिमानाची ज्योत पेटवते. हे महानाट्य इतिहासाची धमक आणि स्वाभिमान जागवणारे उत्तम कार्य आहे.

— श्री. संदीप पाटील

उपसरपंच, ग्रामपंचायत उंचगाव

शिवप्रेमी वाचक

माझे जिवलग मित्र श्री. मनोज शेडगे यांनी लिहिलेले ‘शिवपुत्र संभाजीराजे’ हे नाटक अत्यंत प्रभावी, ओजस्वी आणि मनाला भिडणारे आहे. नाटकातील शब्दफेक, प्रसंगांची मांडणी आणि ऐतिहासिक संदर्भांची जिवंत उकल अतिशय उत्कृष्टरीत्या साकारली आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा धगधगता, संघर्षमय आणि पराक्रमी जीवनप्रवास या नाटकातून जिवंत होतो. पुस्तक वाचताना प्रत्येक प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहतो, हेच या लेखनाचे मोठे यश आहे.

या उत्कृष्ट नाटकाच्या दुसऱ्या आवृत्तीसाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! पुढील वाटचालीसही अशीच यशस्वी उंच भरारी मिळो, हीच सदिच्छा.

— मोहन सावंत

भाजप कार्यकारिणी सदस्य, सिंधुदुर्ग जिल्हा

माजी पंचायत समिती सभापती, कुडाळ

‘छत्रपती संभाजी राजे’ हे नाटक अत्यंत उत्कृष्ट आणि हृदयस्पर्शी आहे. या नाटकातील संवाद प्रभावी, विचारप्रवर्तक आणि मनाला भिडणारे आहेत. मनोज शेडगे सरांनी नाटकाची मांडणी अत्यंत अभ्यासपूर्ण, सुबक आणि जिवंत केली आहे.

या नाटकातून छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, युद्धनीती तसेच प्रजेवरील अपार प्रेम अत्यंत प्रभावीपणे उलगडले जाते. इतिहासातील हा तेजस्वी अध्याय नव्या पिढीसमोर जिवंत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या नाटकाने

केले आहे. अशा प्रकारची ऐतिहासिक आणि संस्कारक्षम नाटके आजच्या काळाची गरज आहेत. समाजात जागरूकता, प्रेरणा आणि स्वाभिमान निर्माण करण्यासाठी अशा साहित्यकृती अधिक प्रमाणात निर्माण झाल्या पाहिजेत.

या अप्रतिम कलाकृतीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन आणि खूप खूप धन्यवाद!

— श्री. गणेश ठाकूर

लेखक, नाट्यदिग्दर्शक, निर्माता, नाट्यकलाकार व मूर्तिकार

दोडामार्ग, सिंधुदुर्ग

प्रिय मित्र मनोज, नमस्कार!

'शिवपुत्र संभाजीराजे' हे तुझे नाटक अत्यंत प्रभावी असून संभाजी महाराजांचा पराक्रम व देशभक्ती उत्कृष्टपणे साकारली आहे. संवाद ओजस्वी असून पात्रांचे व्यक्तिमत्त्व जिवंत करतात. तथापि, पात्रसंख्या कमी करून आणि रचना थोडी संक्षिप्त केल्यास नाटक अधिक प्रभावी होईल. पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

— प्रा. विनायक आभाळे

मुंबई

नमस्कार!

स्वराज्यरक्षक, शिवपुत्र धर्मवीर संभाजी महाराज — हे नावच इतके उत्तुंग आहे की महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या हृदयात ते आजन्म स्थानापन्न झालेले आहे. सकल इतिहासप्रेमी, अभ्यासक आणि संशोधकांना शंभूचरित्राची भुरळ पडली नाही तर नवलच!

अशीच भुरळ सच्चे शिवशंभू अभ्यासक आदरणीय मनोज शेडगे सर यांना पडली. इतिहासाचा बारकाईने अभ्यास करण्याचा त्यांचा स्वभाव आणि त्यातूनच त्यांनी आपल्या शाळेतील मुलांसाठी हे शंभूनाट्य बसवले. उत्तम मांडणीमुळे पुढे या महानाट्याचे पुस्तक प्रकाशित झाले. त्याला लाभलेला उदंड प्रतिसाद हीच या दुसऱ्या आवृत्तीची खरी पावती आहे.

शिवशंभू चरित्र घराघरांत अभ्यासले गेले, तर पुढील पिढी विचारशील, आचारशील, धर्मशील आणि सुशील होण्यासाठी मोठे पाठबळ मिळेल, हे निश्चित! आदरणीय शेडगे सरांना मनःपूर्वक शुभेच्छा!

— डॉ. सोनल लेले

नाट्यकलाकार

शंभूचरित्र वाचुनी डोळे पाणावले,
शौर्य-विद्वत्तेचे सूर मनात रुंजी घालले।
“छावा” च्या रक्ताने इतिहास लिहिला गेला,
वाचता वाचता ऊर अभिमानाने भरला!

शिवश्री शेडगे सरांचे हे लेखन शिवप्रेमींच्या हृदयात अभिमानाची ज्योत पेटवते. हे महानाट्य इतिहासाची धमक आणि स्वाभिमान जागवणारे उत्तम कार्य आहे.

— कु. माऊली बळवंत अडकूर

शिवप्रेमी वाचक

पोर्ले तर्फे ठाणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय शौर्याची जाज्वल्य गाथा या महानाट्यात प्रभावीपणे उभी राहते. औरंगजेबाच्या पाच लाख सैन्याशी झुंजणारा एकच मर्द मराठा — धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज — यांचा पराक्रम अंगावर शहारे आणतो. औरंगजेबाच्या विशाल सैन्यालाही झुंज देणारी त्यांची जिद्द व स्वराज्यनिष्ठा प्रेरणादायी आहे. शिवश्री शेडगे सरांचे हे लेखन इतिहासाची प्रेरणा अधिक जागवून शिवप्रेमींच्या हृदयात अभिमानाची ज्योत पेटवते.

— डॉ. शरद शिंदे

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठान, उंचगाव

‘शिवपुत्र संभाजी राजे’ या महानाट्याच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनासाठी आपणांस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा, सर!

हे पुस्तक वाचताना मन अक्षरशः भारावून गेले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा खरा, प्रेरणादायी आणि जाज्वल्य इतिहास अत्यंत प्रभावीपणे आपल्या लेखणीतून समोर येतो. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेकांना ‘छावा’ सारख्या विस्तृत कादंबऱ्या वाचायला वेळ मिळत नाही; अशा वेळी ही सुटसुटीत आणि परिणामकारक मांडणी सर्वसामान्य वाचकांसाठी, विशेषतः लहान मुलांसाठी, अत्यंत उपयुक्त ठरते.

या पुस्तकामुळे नवीन पिढीला संभाजी महाराजांचा इतिहास सहज, रसपूर्ण आणि प्रेरणादायी पद्धतीने समजू शकतो, हीच याची खरी ताकद आहे. दुसरी आवृत्ती देखील प्रचंड यशस्वी होवो आणि अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचो, ही मनःपूर्वक सदिच्छा!

— शक्ती घरमोडे

शिवप्रेमी वाचक

अर्पणपत्रिका

अतिशय दुर्गम अशा एका छोट्याशा खेडेगावात माझा जन्म झाला. दीड वर्षांचा असताना पोलिओमुळे माझा डावा पाय कमकुवत झाला; पण माझी अशिक्षित आईच माझा पाय बनली. तिने मला जीवनातील खडतर प्रवास सहजपणे पार करायला शिकवले.

भारतीय सैन्यात सेवा बजावणारे माझे वडील आणि "माझं लेकरू चालावं, बरे व्हावं" या वेड्या आशेने डॉक्टरांकडे वनवन फिरून उपचार करणारे माझे आई-वडील, यांच्या त्याग, कष्ट आणि अपार मायेपुढे मी सदैव ऋणी आहे.

त्या माझ्या आई-वडिलांना हे पुस्तक सादर अर्पण.

पात्र-योजना

१. मराठे सरदार

- १. संभाजी राजे
- २. शिवाजी राजे
- ३. राणी येसूबाई
- ४. हंबीरराव मोहिते
- ५. कवि कलश
- ६. म्हाळोजी घोरपडे
- ७. अण्णाजी दत्तो
- ८. मोरोपंत
- ९. कोंडाजी फर्जंत
- १०. येसाजी कंक
- ११. गणोजी शिर्के
- १२. नरोजी भोसले
- १३. जानू
- १४. खंडो बल्लाळ
- १५. संताजी घोरपडे
- १६. धनाजी जाधव
- १७. राणू आक्का, दुर्गा, कमळजा, पिल्या, बिरन्या, इल्या, झोऱ्या, शिपाई

२. मुघल सरदार

- १. औरंगजेब
- २. शहाबुद्दीन खान
- ३. बहादूर खान
- ४. असद खान
- ५. फत्ते खान
- ६. सर्जा खान
- ७. मुखर्ब खान
- ८. इखलास खान
- ९. फौलाद खान
- १०. रुहुल्ला खान
- ११. मियाँ खान
- १२. हसनअली खान
- १३. शिपाई

अंक १

एकाच वेळी मुघल, इंग्रज, डच, पोर्तुगीज, निजाम अशा बलाढ्य शत्रूंशी सलग ९ वर्षे १४० लढाया लढणारा आणि एकदाही न हारणारा मराठशाहीचा 'राजा छत्रपती संभाजी' फंद-फितुरीमुळे तळकोकणातील नावडी नदीकाठी मुखर्रब खानाकडून (शेख निजाम) पकडला जातो.

तोच हा खरा इतिहास घेऊन येत आहे.

[पन्हाळगडाचा दरबार. संभाजी राजे सिंहासनावर विराजमान आहेत. हंबीरराव मोहिते प्रवेश करून मुजरा करतात.]

संभाजी राजे :
"मामासाहेब, आबासाहेब गेले... हे हिंदवी स्वराज्य पुढे जोमाने वाढवण्याची जबाबदारी आमच्यावर टाकून."

हंबीरराव :
"होय, राजे! या महाराष्ट्राची जबाबदारी आता आपल्या खांद्यावर आहे."

संभाजी राजे :
“आपल्यासारखे स्वराज्याचे शिपाई आम्हाला मिळाले, तर आम्ही आमच्या कार्यात तसूभरही कमी पडणार नाही.”

हंबीरराव
“शंभूराजे, हे राज्य निर्माण करताना शिवरायांनी या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतील एकेक मावळा एकत्र आणला, स्वराज्याची वज्रमूठ बांधली आणि हे स्वराज्य उभे केले. आज हाच सह्याद्री आपल्याला खुणावतो आहे, साद घालतो आहे. इथल्या रयतेला शंभूराजांचेच राज्य हवे आहे. तेव्हा आपण...”

संभाजी राजे :
“मामासाहेब, आबासाहेबांना अनेक आघाड्यांवर आम्ही साथ दिली. आमच्यावर त्यांचा विश्वासही होता—हे हिंदवी स्वराज्य हा शंभूराजाच वाढवेल, सांभाळेल.”

हंबीरराव :
“होय, राजे! आपल्या पराक्रमावर शिवाजी महाराजांचा फार विश्वास होता. आता राजे नसले, तरी आपण हे राज्य सांभाळाल, यात त्यांना कोणतीच शंका नव्हती.

शिवाजीराजे एकदा बोलता बोलता आम्हांस म्हणाले होते—
‘माझा शंभूबाळ हे स्वराज्य खूप मोठं करेल; रयतेचा राजा म्हणून नाव कमावेल.’

त्यावर मी त्यांना विश्वास दिला—
‘राजे, आपला शंभू खरा वारसदार आहे; रयतेला हवा-हवासा वाटणारा राजा आहे.’

त्यावर राजे हसले आणि म्हणाले—
‘बस! यापलीकडे आम्हांस काही नको.’”

संभाजी राजे :
“मामासाहेब, आपण या स्वराज्याचे सरसेनापती. आज आपल्या स्वराज्यावर एकाच वेळी अनेक शत्रू आक्रमण करण्याच्या तयारीत आहेत.

उत्तरेकडून तो काळसर्प औरंगजेब पाच लाखांची फौज घेऊन दक्षिणेत उतरत आहे. गोव्यात पोर्तुगीज, दक्षिणेत आदिलशहा व निजाम, मुंबईत इंग्रज—या सर्वांशी एकाच वेळी झुंज देणे आपल्यासाठी कठीण आहे.”

हंबीरराव :
“खरं आहे, राजे! आपल्याकडे जेमतेम सत्तर हजारांची फौज आहे. या सर्वांशी झुंज द्यायची म्हटलं, तर अजून आपल्याला फौज उभी करावी लागेल. शिवाय खजिनाही भरपूर हवा.”

[दरम्यान, एक शिपाई येऊन कवी कलश भेटीस आले असल्याची बातमी देतो. राजे त्यांना आत बोलावतात. कवी कलश मुजरा करून प्रवेश करतात.]

संभाजी राजे :
“या, कविराज! बरं झालं, तुम्ही वेळेवर आलात. आम्ही तुमचीच वाट पाहत होतो.”

कवी कलश : (स्मितहास्य करत)
“बोला, राजे! काय हुकूम आहे?”

संभाजी राजे :
“कविराज, एखाद्या अडचणीच्या वेळी कोणता निर्णय घ्यावा, असे तुम्हाला वाटते?”

कवी कलश :
“राजे, आपण समरधुरंधर, पंडित, ज्ञानी, थोर कायदेतज्ज्ञ! अशा आपल्या राज्याला आम्ही काय सल्ला देणार?”

संभाजी राजे :
“बरं, ते जाऊ दे. मामासाहेब, तो औरंगजेब स्वराज्यावर चालून येण्याआधी आपण दक्षिणेवर स्वारी करावी, असे आम्हाला वाटते.

तो काळसर्प स्वराज्यावर येण्यासाठी अजून पाच-सहा महिने लागतील. तोपर्यंत आपण दक्षिण लुटू. स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी मोठा खजिना लागेल; त्याची जुळवाजुळव करू.”

कवी कलश :
“वा, राजे, वा! उत्तम—अगदी उत्तम. या सर्वांना सामोरे जायचे, तर खजिना लागणारच.”

संभाजी राजे :
“आबासाहेबांनी निर्माण केलेले हे कोट्यवधी होनांचे हिंदवी स्वराज्य—हा खजिना सांभाळण्यासाठी आपण सर्वांनी पुढे आले पाहिजे.”

हंबीरराव :
“शंभूराजे, हे स्वराज्य निर्माण करण्यासाठी आम्ही रात्रंदिवस परिश्रम केले. ते सांभाळण्यासाठी आम्ही आमचे प्राण देऊ; पण हे स्वराज्य कोणाच्या घशात जाऊ देणार नाही—याची खात्री आम्ही आपणास देतो.”

संभाजी राजे :
“मामासाहेब, आम्हाला त्याची पूर्ण कल्पना आहे. तुमच्यासारख्या शूर मराठ्यांच्या खांद्यावरच हे स्वराज्य उभे आहे—आणि पुढेही तसेच राहील.”

कवी कलश :
“राजे, आपल्या बरोबर स्वराज्यातील रयत आहे; मामासाहेबांसारखे शूर सेनापती आहेत. अशा वेळी चिंता करण्याचे कारणच नाही.”

संभाजी राजे :
“कविराज, आम्ही आमची चिंता करत नाही; आम्ही स्वराज्याची चिंता करत आहोत. स्वराज्यावर वाकडी नजर करणाऱ्याची मुंडी मारल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही!”

हंबीरराव :
“शंभूराजे, दक्षिण मोहिमेसाठी आम्ही फौजेसहित तयारी करतो. आपल्या हुकुमाची वाट पाहत आहोत.”

संभाजी राजे :
“मामासाहेब, आपण निघा. पंधरा हजारांची फौज तयार ठेवा. काही कमी-जास्त वाटल्यास तत्काळ आम्हाला कळवा.”

[दोघे एकमेकांना कडकडून भेटतात. हंबीरराव मुजरा करून बाहेर जातात.]

संभाजी राजे :
“कविराज, आपण कोणती आघाडी सांभाळणार आहात?”

कवी कलश :
“राजन, आम्हांला आपण कोणतीही आघाडी द्या. आमच्या जीवात जीव असेपर्यंत तुमच्या आणि स्वराज्याच्या केसालाही धक्का लागू देणार नाही.”

संभाजी राजे :
“कविराज, खरोखरच तुम्ही आमचे दिलाचे सच्चे दोस्त आहात.”

कवी कलश :
“राजन, तुमच्यासारख्या सच्च्या दिलाच्या मित्रासाठी आम्ही आमचा जीव ओवाळून टाकू. ते भाग्य आम्हांस लाभले, तर आम्ही ती संधी मुळीच सोडणार नाही.”

संभाजी राजे :
“कविराज, उत्तरेकडून औरंगजेबाचा सेनासागर या महाराष्ट्राच्या मातीवर चालून येत आहे. त्या काळसर्पाला वेळीच ठेचले नाही, तर हिंदवी स्वराज्यावर संकटाचे पहाड कोसळतील. आपले स्वराज्य म्हणजे सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतील डोंगरी किल्ले—त्यांचे संरक्षण म्हणजे स्वराज्याचे रक्षण!”

कवी कलश :
“होय, राजन! आपले किल्ले म्हणजेच आपले स्वराज्य. आपल्या सर्व किल्लेदारांना तशा सूचना आम्ही केव्हाच दिलेल्या आहेत.”

संभाजी राजे :
"वा, कविराज, वा! आपण तर स्वराज्याचे आमचे खरे शिलेदार आहात. एक सच्चा मित्र म्हणून आम्हांस तुमचा फार अभिमान वाटतो."

कवी कलश :
"राजे, आता स्तुतीत वेळ घालवू नका. स्वराज्याच्या रक्षणासाठी आपण पुढील कामगिरीसाठी निघाले पाहिजे."

संभाजी राजे :
"होय, कविराज! त्या औरंगजेबाला या मराठी मातीतच गाडू आणि मगच शांत बसू. चला तर मग—निघूया!"

[संभाजी राजे बाहेर जातात. त्यांच्या मागून कवी कलशही निघून जातात. दुसऱ्या बाजूने आण्णाजी दत्तो, मोरोपंत आणि कोंडाजी फर्जत आपसात बोलत-बोलत प्रवेश करतात.]

हंबीरराव :
"या... प्रधानजी, या!"

आण्णाजी दत्तो : (मृदू स्वरात)
"छत्रपती गेले... मराठी राज्याचा आधार गेला. हंबीरराव, मराठी रियासतीचं काय होणार—काहीच समजत नाही. थोरले महाराज आमचा मान राखत नव्हते. राजे असतानाही आमचा मुलाहिजा ठेवत नव्हते. आता तर ते आम्हाला ठेवणारही नाहीत.

आम्ही म्हणतो, हंबीरराव—आपले भाचे राजाराम महाराजांना गादीवर बसवू आणि संभाजीराजांना कैद करू."

हंबीरराव : (रागाने)
“का?”

आण्णाजी दत्तो :
“संभाजी राजे मराठी सत्ता योग्य रीतीने सांभाळतील, असे आम्हास वाटत नाही.”

हंबीरराव : (ठाम आणि संतप्त स्वरात)
“प्रधानजी, ज्यांनी हे हिंदवी स्वराज्य निर्माण केलं... ज्यांनी मराठी माणसाची मान उंचावली, अनेक शत्रूंशी एकाच वेळी सामना केला, स्वतःच्या स्वार्थाचा कधी विचारच केला नाही—

ते जाऊन अकरा दिवसही झाले नाहीत... आणि तुम्ही त्यांच्या पुत्राला कैद करायला निघाला आहात? यापेक्षा मोठं दुर्दैव कोणतं?”

मोरोपंत : (घाबरत)
“तसं नाही, हंबीरराव...”

हंबीरराव : (करारी आवाजात)
“मग कसं? तुमची चाल माझ्या केव्हाच लक्षात आली आहे, प्रधानजी!

राजाराम महाराज आमचे भाचे असले, तरी ते अजून अल्पवयीन आहेत. संभाजी राजांनी शिवाजी महाराजांबरोबर अनेक आघाड्या सांभाळल्या आहेत. राजे असतानाही त्यांनी आपली कामगिरी सिद्ध केली आहे.

हे तुम्हाला माहीत असतानाही हा कुटील डाव कशासाठी, आण्णाजी?”

आण्णाजी दत्तो : (घाबरलेल्या अवस्थेत)
“आपण गैरसमज करून घेत आहात, हंबीरराव...”

हंबीरराव : (हसत, पण ठामपणे)
“गैरसमज? आणि आम्ही?

प्रधानजी, आम्ही सेनापती आहोत—शिवाजी महाराजांच्या खांद्याला खांदा लावून या स्वराज्यासाठी तापून-सुलाखून निघालेला सेनापती! आजपर्यंत आम्ही कधीच स्वतःचा विचार केला नाही.

ही मराठशाही आपली सर्वांची आहे. हे हिंदवी स्वराज्य राजांनी आमच्यासारख्या अनेक शिपायांना एकत्र करून निर्माण केलं—ते कशासाठी?”

आण्णाजी दत्तो :
“आम्ही तोच विचार करत आहोत, हंबीरराव...”

हंबीरराव : (कडक आवाजात)
“बस! आम्ही तुमचं यापुढे काहीही ऐकू शकत नाही. तुम्ही मुघलांनाही सामील व्हाल, याची शंका आहे. आमचा तुमच्यावर आता अजिबात विश्वास राहिलेला नाही.

कोण आहे रे तिकडे? कैद करा या हरामखोर माणसांना!”

[शिपाई तलवारी घेऊन धावत येतात.]

आण्णाजी दत्तो : (गयावया करत)
“माफ करा, हंबीरराव! आम्हांस माफ करा. आमच्याकडून यापुढे असे होणार नाही...”

[सर्वजण भीतीने थरथर कापतात. शिपाई त्यांना पकडतात. सर्वजण हंबीररावांचे पाय धरून विनवणी करतात.]

हंबीरराव : (रागाने लालबुंद होत)
“यांना पन्हाळगडावर राजांसमोर हजर करा!”

[शिपाई त्यांना घेऊन जातात.]

हंबीरराव : (स्वगत, संतप्त स्वरात)
“स्वतःच्या स्वार्थासाठी स्वराज्य विकायला निघालेल्या नालायक कारभाऱ्यांचं करायचं तरी काय? पन्हाळगडावर जाऊन राजांची भेट घेतलीच पाहिजे; नाहीतर स्वराज्याचा घात होईल!”

[हंबीरराव रागाने ताडकन निघून जातात.]

पडदा....

[पन्हाळगडाचा दरबार. राजांसमोर हंबीरराव सर्व कैद्यांना हजर करतात. सर्वजण मान खाली घालून उभे आहेत.]

हंबीरराव :
“राजे, हे घ्या—हे नालायक, हरामखोर माणसं!”

संभाजी राजे : (उठून, शांतपणे सर्वांकडे पाहत)
“आबासाहेब जाऊन अजून त्यांच्या कार्यालाही पूर्णविराम मिळालेला नाही... आणि तोवर—परकीयांशी दोन हात करायचे की स्वकीयांशी?

मामासाहेब, किती दुर्दैव आमच्या वाट्याला आलं आहे!”

हंबीरराव :
“राजे, असं हतबल होऊन चालणार नाही. तुमच्या पाठीशी हे हंबीरराव पर्वतासारखे उभे आहेत.

येणाऱ्या संकटांना चिरडून टाकण्यासाठी या सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांतून लाखो मावळे या मराठशाहीसाठी धावून आपल्या पाठीशी उभे राहतील—याची आम्हांस खात्री आहे.

शंभूराजे, आपल्यासारखा रयतेवर प्रेम करणारा राजा दुसरा कोणी नाही!”

संभाजी राजे :
“मामासाहेब, तुमच्यासारख्या एकनिष्ठ शिपायांच्या खांद्यावरच ही मराठशाही उभी आहे.

या हरामखोरांची चाल आम्हाला माहीतच होती. आपण योग्य वेळी त्यांना ठेचलं—ते योग्यच केलंत.

आम्हांस यांच्याशी बोलण्याची, किंबहुना त्यांची तोंडं पाहण्याचीही अजिबात इच्छा नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी माणूस किती वेळा चूक करणार? यालाही काही मर्यादा असतात!

घेऊन जा यांना!" (रागाने)

[शिपाई कैद्यांना घेऊन जातात.]

हंबीरराव :
"शंभूराजे, आमच्या जीवात जीव असेपर्यंत आम्ही स्वराज्याचे पाईक राहू!"

संभाजी राजे : ***(जवळ येत)***
"मामासाहेब, आम्हाला तुमचा अभिमान वाटतो. आपले सख्खे भाचे राजाराम असतानाही तुम्ही या संकटकाळात आम्हाला साथ दिलीत—याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत."

हंबीरराव :
"राजे, आम्ही स्वराज्याचे पाईक आहोत. आजपर्यंत आम्ही कधीही स्वार्थाला शिवलो नाही—आणि शिवणारही नाही. ही शिकवण शिवाजी महाराजांचीच आहे."

संभाजी राजे :
"ते आम्हांस ठाऊक आहे, मामासाहेब. पण माणसाचा खरा शत्रू हा स्वार्थच असतो."

हंबीरराव : ***(विषय बदलत)***
“होय, राजे. पण आम्ही त्यापासून दूर आहोत. आता स्वराज्यावर आलेल्या संकटाचा विचार करणे आवश्यक आहे.”

संभाजी राजे :
“मामासाहेब, स्वराज्याचा घाट बांधायचा आहे; पण त्या औरंग्याचाही थाट उतरवला पाहिजे. मोक्याची जागा शोधा!”

हंबीरराव :
“राजे, एक जागा आहे—औरंगजेबाचं आवडतं ठिकाण. दक्षिणेतील त्याची राजधानी बुऱ्हानपूर आणि औरंगाबाद.”

संभाजी राजे :
“मग टाका छापा त्या बुऱ्हानपूरावर! करा कोळसा बुऱ्हानपूराचा... आणि औरंगाबादालाही सोडू नका.

लुटा या दोन्ही मुघलांच्या ठिकाणांना! कळू द्या त्या औरंग्याला—या हिंदुस्थानात त्याच्याशी झुंज देणारा एकच राजा आहे—तो म्हणजे सरजा संभाजी!”

हंबीरराव :
“राजे, आजपर्यंत कोणी एवढं धाडस केलं नाही. तो काळसर्प चवताळून दक्षिणेत चालून येईल. अनेक सरदार आपल्या मागे सोडेल.”

संभाजी राजे :
“मामासाहेब, आम्ही शिवछत्रपतींचे पुत्र! तुमच्यासारखे मराठे सरदार

आमच्या बरोबर असतील, तर असे हजारो औरंगजेब आम्ही अंगावर घेऊ—आणि त्याची मस्ती जिरवू!”

हंबीरराव :
“पण, राजे...”

संभाजी राजे : *(ठाम स्वरात)*
“चला, मामासाहेब! स्वराज्यावर वाकड्या नजरेने पाहणाऱ्या त्या पातशहाला संभाजीचा दणका काय असतो, हे कळलं पाहिजे!”

[संभाजी राजे निघतात. हंबीरराव त्यांच्या बरोबर निघतात.]

पुढील दृश्य...

[जंगली रस्ता. बहादूर खान, फते खान आणि शहाबुद्दीन खान चर्चा करत येतात.]

शहाबुद्दीन खान :
“संभाजी... संभाजी... संभाजी... कहाँ है ये हैवान? उसने तो हमारी नींद हराम कर दी है!”

फते खान :
“हम जल्दी ही उसे गिरफ्तार करेंगे और शहंशाह के सामने पेश करेंगे!”

बहादूर खान :
“संभाजी को पकड़ना इतना सीधा काम नहीं, फते खान! वो भूत है—भूत! कब आता है और हमला करता है, मालूम भी नहीं पड़ता!”

[अचानक गर्जना]
“हर हर महादेव! शिवाजी महाराज की जय! संभाजी महाराज की जय!”

[हंबीरराव, ज्योत्याजी केसकर, म्हाळोजी घोरपडे अचानक हल्ला करतात. जोरदार लढाई होते. तिघेही घाबरून पळून जातात.]

हंबीरराव :
“आज वाचलात! पण उद्या आमच्याशीच गाठ आहे. शिवछत्रपतींच्या स्वराज्याकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याची खांडोळी केल्याशिवाय आम्ही कधीही स्वस्थ बसणार नाही!”

म्हाळोजी :
“या यवनांची लांडगेतोड केल्याशिवाय रयत सुखी होणार नाही. जिथे मिळतील तिथे कापून काढलं पाहिजे!”

[सर्वजण ‘हर हर महादेव’च्या गर्जनेसह निघून जातात.]

पुढील दृश्य...

[औरंगजेबाचा दरबार. नमाज सुरू आहे. तेवढ्यात असद खान प्रवेश करतो.]

असद खान :
“हुजूर! बहादूर खान, फते खान और शहाबुद्दीन खान—इन सबको संभाजी ने शिकस्त दी है। तीनों ने संभाजी के सामने हार मानी है।”

औरंगजेब : *(हळूच उठत, संतापाने)*
“क्या बकते हो तुम? इतना खजाना, इतने सरदार, इतनी तोपें देकर भी... हार?”

असद खान :
“हाँ, हुजूर...”

औरंगजेब :
“तो क्या करते हैं ये लोग?”

असद खान :
“हुजूर, वो कहते हैं—संभाजी शैतान है... शिवाजी से भी ज़्यादा शैतान!”

औरंगजेब : *(क्रोधाने)*
“दक्खन पर हिंदुस्तान का बादशाह पाँच लाख की फौज लेकर भी हार खाएगा?

कुछ भी करो—संभाजी को हमारे सामने पेश करो! ज़िंदा या मुर्दा!”

असद खान :
“हुजूर... वो संभा सचमुच शैतान है!”

औरंगजेब : *(अहंकाराने, उग्र स्वरात)*
“तो क्या हम शैतान से कम हैं?

उन नालायक सरदारों से कह दो—कुछ भी करो! संभाजी को पकड़ना ही होगा—ज़िंदा या मुर्दा!”

[औरंगजेब संतापाने निघून जातो.]

पुढील दृश्य...

[रामसेज किल्ल्यावर हल्ला. जोरदार लढाई सुरू आहे. किल्लेदार सूर्याजी जेधे आणि मराठा सैनिक दगडांनीही लढत आहेत. मुघल सैन्याला पराभव पत्करावा लागतो.]

[दुसऱ्या बाजूने शहाबुद्दीन खान जखमी अवस्थेत प्रवेश करतो. त्याच्यासोबत मुघल सैनिक.]

शहाबुद्दीन खान :

“कैसे हैं ये मरहट्टे? पत्थरों से भी लड़ते हैं!”

सरजाखान :

“हाँ, हुजूर! ये मरहट्टे शैतान से भी ज़्यादा ख़तरनाक हैं!”

फते खान :

“मेरा तो दिमाग ही काम नहीं कर रहा... मुझे तो लगता है ये मरहट्टे भूत हैं—भूत!

ये दिन में नहीं लड़ते... सब कुछ रात में ही करते हैं!

[पार्श्वनिवेदन]

“रामसेज किल्ला तब्बल सहा वर्षे सहा महिने लढवला गेला. या काळात एकही किल्ला मराठ्यांनी मुघलांना दिला नाही. स्वराज्यासाठी मराठे अहोरात्र झुंज देत राहिले.”

पडदा...

अंक २

[पन्हाळगडाचा दरबार. येसूबाई तुळशीला पाणी घालत आहेत. मागून गणोजी शिर्के प्रवेश करतात.]

येसूबाई :
"या, दादासाहेब."

गणोजी : *(मुजरा करत)*
"आता आपण रायगडच्या राणीसाहेब आहात. तुमच्या पायाशी हे करोडो होनांचं हिंदवी स्वराज्य आलं आहे."

येसूबाई :
"दादासाहेब, आपण इकडे येण्याऐवजी सरळ रायगडावर गेला असता, तर अधिक योग्य झालं असतं. तिथलं काम, तिथली व्यवस्था..."

गणोजी :
"किती काळजी करशील, येसू? संपले ते एका जहागिरीपुरते दिवस! आता भाग्य तुझ्या पाठीशी सावलीसारखं उभं आहे."

येसूबाई :
"त्याचं श्रेय आम्हाला कसं देता? ही सारी देण आमच्या मामंजींची—

शिवरायांचीच! त्यांनीच आपल्या सुनेची पारख केली होती. खरे रत्नपारखी तेच!”

गणोजी : *(थोडा थांबून)*
“येसू, महाराणीची वस्त्रं परिधान केल्यावर विसरणार तर नाहीस ना—तुझ्या या भावाला?”

येसूबाई : *(हसत)*
“काय गंमत करता, दादा!”

गणोजी :
“गंमत नाही. आम्हा गरीबांचं इतकंच म्हणणं—तुमचा भाग्योदय झाला आहे; त्यातले चार किरण आमच्याकडेही वळू दे.”

येसूबाई : *(संभ्रमित)*
“असं कोड्यात का बोलता, दादासाहेब?”

गणोजी :
“कोडं नाही. स्पष्ट सांगतो—एकदा सत्ता आली की माणसं विसरतात. म्हणून वेळेत आठवण करून देतो.

ज्या दिवशी तू महाराणी म्हणून रायगडावर छत्राखाली उभी राहशील, त्या दिवशी आपल्या भावाच्या घरावर एक छोटंसं तोरण बांधशील—तर उपकार होतील.”

येसूबाई :
“कसलं तोरण?”

गणोजी :
“वतनाचं!”

येसूबाई :
“कसलं वतन, दादासाहेब?”

गणोजी :
“आम्ही राजेशिर्के. नव्याने काही नको—पिढ्यान् पिढ्या चालत आलेलं दाभोळचं देशमुखीचं वतन आम्हाला परत द्या.”

येसूबाई : *(बावरून)*
“दादासाहेब, सध्या राजवाड्यात गडबड आहे. राजे अजून रायगडावर गेलेले नाहीत, त्यांनी कारभाराची सूत्रंही हातात घेतलेली नाहीत. थोडी सबुरी ठेवा.”

गणोजी : *(हट्टाने)*
“आम्हाला वतन मिळणार की नाही—ते स्पष्ट सांगा!”

येसूबाई :
“मी राजांना विचारते.”

गणोजी : *(रागाने)*
“गुन्हा आमचा नाही—तुझ्या त्या थोर सासऱ्यांनी आमच्यावर जुलूम केला! दबावाने आमचं दाभोळचं वतन खालसा केलं.”

येसूबाई :
“स्वतःच्या स्वार्थासाठी शिवरायांना दोष देता? आपण त्यांचे जावई आहात हे विसरलात का?

मामंजींचं धोरण होतं—कोणालाही वतन देऊ नये.”

गणोजी : *(संतापाने)*
“वतनाशी तुमच्या भोसल्यांचा काही संबंध नाही! दाभोळचं वतन आम्हाला आदिलशहाने दिलं होतं. आम्ही भीक मागत नाही—हक्क मागतोय!”

येसूबाई :
“क्षमा करा, दादासाहेब. थोडा वेळ द्या. शंभूराजे आता स्वराज्याचे सम्राट होणार आहेत—त्यांच्या पाठीशी उभं राहणं गरजेचं आहे.”

गणोजी :
“म्हणूनच आठवण करून दिली. निदान तुमच्याकडून तरी न्याय मिळेल.”

येसूबाई :
“वतनासारख्या नाजूक विषयावर आम्ही घाईत निर्णय घेऊ शकत नाही. राजांना भेटा.

राजे संकटात असताना आपण त्यांना धीर द्यायचं सोडून वाद घालत आहात—हे योग्य नाही.”

गणोजी : *(उद्धटपणे)*
“काय योग्य-अयोग्य ते तू आम्हाला शिकवू नकोस! वतनाचा निर्णय होईपर्यंत आम्ही तोंड दाखवणार नाही!”

[गणोजी संतापाने निघून जातात.]

येसूबाई : *(स्वगत)*
“चारही बाजूंनी शंभूराजे संकटात असताना, स्वकीयांनाच अशी बुद्धी सुचावी!

घरच्यांनीच विश्वासघात करावा? शिवरायांनी उभं केलेलं स्वराज्य वाचवण्यासाठी शंभूराजे अहोरात्र लढत आहेत... आणि घरातीलच लोक समजून घेत नाहीत!

राजांना सावध केलं पाहिजे.”

[निघून जातात.]

पुढील दृश्य....

[पन्हाळगडाचा दरबार. संभाजी राजे बसलेले. हंबीरराव मुजरा करून प्रवेश करतात.]

संभाजी राजे :
“या, मामासाहेब. काय बातमी?”

हंबीरराव :
“शंभूराजे, मुघल सरदार अनेक वर्ष रामसेजवर चढाई करत आहेत; पण सूर्याजी जेधे किल्ला शर्थीनं लढवत आहेत.”

संभाजी राजे :
“मामासाहेब, मराठ्यांचा जन्म वीजांच्या कडकडाटात आणि तोफांच्या गडगडाटात झालाय!”

स्वराज्य आम्ही सहजासहजी कोणालाही देणार नाही. पोर्तुगीजांना धूळ चारली, इंग्रजांची मस्ती जिरवली, पाण्यावर तरंगणारा तोफखाना उभारला!

रयतेवर लेकरांसारखं प्रेम केलं... मराठे तलवारीच्या टोकावर मरण घेऊन फिरतात—हे त्यांना माहीत नाही का?”

हंबीरराव :
“राजे, एक वाईट बातमीही आहे...”

संभाजी राजे :
“कोणती?”

हंबीरराव :
“फितुरी वाढते आहे... गणोजी शिर्के मुघलांना मिळाले—अशी खात्रीशीर खबर आहे.”

संभाजी राजे : *(धक्का बसून)*
“काय? गणोजी शिर्के!

नात्याचे पदरचे लोकच स्वराज्याची कदर करत नसतील, तर ते कसले? या स्वराज्यात काय कमी होतं त्यांना?”

[कवी कलश मुजरा करत प्रवेश करतात.]

कवी कलश : *(मुजरा करत)*
“राजे, दु:खाची बातमी आहे.”

संभाजी राजे :
“बोला, कविराज... बोला. आम्हाला आता अशा बातम्यांची सवय झाली आहे.”

कवी कलश :
“कोंडाजी मुघलांना मिळाले.”

संभाजी राजे : *(धक्का बसून, संतापाने)*
“काय? कोंडाजीनीही हाच मार्ग धरला?

स्वराज्य निर्माण करण्यासाठी आबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून ज्यांनी हे हिंदवी स्वराज्य उभं केलं—त्यांनाच अशी वाईट बुद्धी सुचावी? यापेक्षा मोठं दुर्दैव कोणतं, कविराज?

आपलेच घरातील लोक परक्यांची चाकरी करत असतील, तर हे स्वराज्य निर्माण कुणासाठी करायचं... आणि कशासाठी?"

कवी कलश :
"जहागिरी, वतने, सुभेदारी अशी आमिषे देण्याचं कबूल केलं आहे औरंगजेबाने—या सर्वांना."

संभाजी राजे : *(संतप्त स्वरात)*

"ज्याला स्वतःचा स्वाभिमान कळत नाही, स्वार्थासाठी आपल्या आया-बहिणींना मुघलांच्या दावणीला बांधणारे—अशी माणसं आम्हाला हव्यातच कशाला?

अजून कोण कोण आहेत असे नमकहराम—ते सापडतील तिथे त्यांची खांडोळी करा!

अशी नालायक, नमकहराम माणसं स्वराज्यासाठी घातक आहेत."

हंबीरराव मोहिते :
"शंभूराजे, निंबाळकर, जाधव, महाडिक—ही आपलीच माणसं मुघलांच्या संपर्कात आहेत, अशी खात्रीशीर खबर आहे.

संभाजी राजे : *(ठाम आणि प्रेरणादायी स्वरात)*
"मामासाहेब, संताजी, धनाजी, रायप्पा, ज्योत्याजी, म्हाळोजीबाबा, येसाजी, कवी कलश—अशी जीवावर उदार होणारी माणसं या शंभूराजांबरोबर असतील, तर आम्हांला हजार हत्तींचं बळ येतं!

या शिवरायांच्या स्वराज्याचं रक्षण करण्यासाठी आम्ही कुठेही कमी पडणार नाही.

मग जे जायचं ते जाऊ देत—आम्हाला त्यांची पर्वा नाही!"

हंबीरराव मोहिते :
"होय, राजे. बाकीची रयत आपल्या पाठीशी आहे. त्यांना शंभूराजांचंच स्वराज्य हवं आहे."

कवी कलश :
"होय, राजन!"

संभाजी राजे : *(शून्यात पाहत)*

"एकीकडे पुण्यप्रतापी आबासाहेब कैलासवासी झाले... आणि दुसरीकडे पिसाळलेल्या हत्तींच्या झुंडीप्रमाणे औरंग्या हिंदवी स्वराज्यावर चालून येत आहे.

अशा वेळी आम्हाला आधार देण्याऐवजी, आपल्या क्षुल्लक स्वार्थासाठी आणि छोट्याशा आकांक्षेसाठी कारभाऱ्यांनी राजद्रोहाचा घाट घातला!

नऊ-दहा वर्षांच्या अजाण मुलाला राज्यपदाची बागडोर देण्याचा पोरखेळ त्यांनी केला. एवढं होऊनही आम्ही गप्प बसलो—त्यांना दंड केला नाही.

उलट मोठ्या मानाने पुन्हा सर्व कारभार त्यांच्याच हाती सोपवला. प्रधानपदाची सुवर्णकंकणं त्यांच्या हातात घातली. ज्या घोड्यावरून उतरवलं होतं, त्याच घोड्यावर पुन्हा बसवलं!

राजद्रोहासारख्या अक्षम्य गुन्ह्यासाठीही आम्ही त्यांना टकमकीचा रस्ता दाखवला नाही... पण त्यांनी मात्र याचा विचार केला नाही.

पुन्हा पुन्हा तोच गुन्हा केला—आमच्या अन्नात विष कालवलं!

त्यांच्या या 'पुण्यकर्मा'साठी राजा म्हणून आम्ही काय करावं?"

कवी कलश :
"राजन, आपण केलेली शिक्षा योग्यच आहे."

संभाजी राजे :
"पोरासारखं आम्ही रयतेवर प्रेम केलं. आबासाहेबांच्या नंतर त्यांची उणीव कधीही भासू दिली नाही.

तीच जनता हे स्वराज्य वाचवेल.

मामासाहेब, त्या औरंगजेबाचे फासे कुठे कुठे पडत आहेत, याची माहिती आम्हांला देत जा."

हंबीरराव मोहिते :
"होय, राजे. आम्ही निघतो." *(मुजरा करून निघतात.)*

(संभाजी राजे सिंहासनावर बसतात. येसूबाई प्रवेश करतात. मुजरा. कवी कलशही मुजरा करून निघून जातात.)

संभाजी राजे :
"या, येसू राणीसाहेब या! बसा. आम्हाला तुमच्या सल्ल्याची गरज वाटते."

येसूबाई :
“बोला, राजे.”

संभाजी राजे :
“येसू, आम्हाला कधी कधी वाटतं—ही भूमी फक्त ज्ञानवंतांची, संत-महंतांची नाही; तर कृतघ्नांची, फितुरांची आणि दलबदलूंचीही आहे.

ती फक्त राज्यासाठी शिरकमळ अर्पण करणाऱ्यांची नाही; तर जमीन-जुमल्याच्या तुकड्यासाठी, क्षुल्लक स्वार्थासाठी इमान आणि स्वराज्य विकणाऱ्यांचीही आहे.”

येसूबाई :
“माफ करा, राजे... आमच्या माहेरच्यांनी आपल्याला दगा दिला.

संभाजी राजे :
“येसू, तुझ्या माहेरच्यांचं काय? आमचं आजोळच मुघलांकडे गेलं आहे!

ज्यांनी पोर्तुगीजांना थयथय नाचवलं, इंग्रजांची मस्ती जिरवली, पाण्यावर तरंगणारा तोफखाना उभारला, रयतेवर लेकरासारखं प्रेम केलं—

कर्नाटक, त्रिवेंद्रम, चेन्नई, मद्रास, तामिळनाडू, पाषाणकोट—सगळं जिंकलं...

हे सगळं कुणासाठी आणि कशासाठी?”

येसूबाई : *(धीर देत)*
“राजे, असे निराश होऊ नका.

आपल्या बरोबर मामासाहेब, मानाजी, रुपाजी, संताजी, धनाजीसारखे शूरवीर आहेत.

आपण त्या औरंग्याच्या पाच लाख फौजेलाही पुरून उराल. सारी प्रजा तुमच्या पाठीशी आहे.

मुठभर लोकांनी तोंड काळं केलं म्हणून काय झालं?

आबासाहेबांनी एकेक मावळा जमवून स्वराज्याचं तोरण बांधलं—हे आपल्याला ठाऊक आहे ना, राजे?"

संभाजी राजे :
"खरंच, येसू... तुझ्यामुळे आम्हाला रणांगणात लढण्याची उर्मी येते."

येसूबाई : *(त्वेषाने)*
"राजे, आपलं शौर्य त्या औरंग्याला चांगलं ठाऊक आहे.

तो काळसर्प अंगावर आला, तर तलवारीच्या टोकावर घेऊ!

गरज पडली तर आम्हीही उतरू रणांगणात—तुमच्या खांद्याला खांदा लावून!"

संभाजी राजे :
"वा! येसू, वा! खरोखरच तू आबासाहेबांची सून शोभतेस. तो औरंग्या आमच्या समोर आलाच, तर इथंच त्याची कबर बांधू आम्ही!"

येसूबाई :
"चला, राजे. शत्रू आपल्या मागावर आहे. आपल्याला सावध राहिलं पाहिजे."

संभाजी राजे :
“होय, येसू... किती काळजी करशील आमची!” *(दोघे निघून जातात.)*

[औरंगजेबाची छावणी]

(औरंगजेब सिंहासनावर बसलेला. शिपायाला हुकूम देतो.)

औरंगजेब :
“सर्जाखान को बुलाओ!”

(सर्जाखान प्रवेश करतो, मुजरा करतो.)

औरंगजेब :
“सर्जा, हमने विजापूर के कुप्रसिद्ध किले की पीठ तोड़ दी, गोलकोंडा उखाड़कर खंदक में फेंक दिया... सच कहूँ, यह कोई बहादुरी नहीं!

एक ही दुख है—संभा!

तू पहले विजापूर का सिपहसालार था, आज हमारा सरदार है.”

सर्जाखान :
“जी, जहाँपनाह!”

औरंगजेब
“उस काफ़िर संभा को गाड़ने की औकात मेरे तीन शहजादों में नहीं, बावीस नातवंडांत नाही, तीस सरदारांमध्येही नाही!

उस शैतान के सामने तुझ्यासारखा एखादा दख्खनी गाज़ीच उभा राहू शकतो.

जा—हवी तितकी फौज, खजाना आणि रसद घे... आणि त्या संभाजीला आमच्यासमोर हजर कर—जिवंत किंवा मृत!

जब तक संभा गिरफ्तार नहीं होता, तब तक यह शहनशाह अपने सिर पर ताज नहीं पहनेगा!"

सर्जाखान :
"हुकुम, जहाँपनाह! हम संभाजी को पेश करेंगे—जिंदा या मुर्दा!"

औरंगजेब :
"और सुन... अगर संभा की गर्दन लेकर आया, तो तुझे सिकंदर जैसा मान देंगे!

लाल किले पर खिलअत पहनाकर तेरा सम्मान करेंगे.

और अगर संभा न मिले—तो उसका कोई बड़ा किला ले आ! रायगढ़, राजगढ़, पन्हाळा, प्रतापगढ़—कुछ भी... खाली हाथ मत आना!"

सर्जाखान :
"ज़रूर, जहाँपनाह!"

(सर्जाखान निघून जातो. औरंगजेब "या अल्लाह..." म्हणत बाहेर जातो.)

[पाचगणीचे जंगल – रात्रीचा प्रसंग]

(अंधार. किड्यांचा किरकिर आवाज. हंबीरराव आणि नारोजी धावत येतात.)

हंबीरराव मोहिते :
"त्या औरंग्याला दफन केल्याशिवाय हा हंबीरराव पाठ टेकणार नाही!"

(आवाज येतो.)
"कोण आहे रे तिकडे?"

(जानू शिपाई येतो.)

हंबीरराव :
“काय रे जानू, काय खबर आहे?”

जानू :
“सरकार... आपल्या मुलखावर औरंग्यानं सर्जाखानाला धाडलंय. तो इकडेच धावून येतोय.”

हंबीरराव :
“कुठे आहे वैरी?”

जानू :
“कृष्णा नदी ओलांडून आलाय.”

हंबीरराव :
“किती फौज आहे?”

जानू :
“अंदाजे दहा-बारा हजार.”

हंबीरराव :
“दिशा कोणती धरली आहे?”

जानू :
“प्रतापगडाकडे चाललाय. दोन दिवसांत किल्ला घेण्याचा विडा उचललाय.”

हंबीरराव :
“नारोजी, आता काय करायचं? आपली मुख्य फौज कोकणात आहे.”

नारोजी भोसले :
“सेनापती, काहीही करून वैऱ्याला इथेच रोखलं पाहिजे! प्रतापगड गेला तर अब्रूचा प्रश्न आहे!”

हंबीरराव :
“असं कसं होऊ देऊ आम्ही? औरंग्यानं आदिलशाही, कुतुबशाही गिळली असेल; पण शंभूराजांच्या सह्याद्रीतला एकही किल्ला पडलेला नाही!

आमचे किल्लेदार प्राणपणाने लढत आहेत.

चला—वैऱ्याला वाटेतच अडवू! समोर आला, तर तलवारीच्या टोकावर घेऊ!”

नारोजी :
“पण वाट अवघड आहे...”

हंबीरराव :
“नारबा! अशा वेळी दुसरा उपाय नसतो.

चला—वळवा घोडी! बोला... हर हर महादेव!”

(घोड्यांच्या टापांचा आवाज. सीन बदलतो.)

[लढाईचा प्रसंग]

(“हर हर महादेव!” चा गजर. हंबीररावांचे सैन्य अचानक हल्ला करते. जोरदार लढाई. सर्जाखान पळून जातो.)

हंबीरराव :
“पळालास आज... पण लक्षात ठेव!

या मराठ्यांच्या तलवारीपासून तू कायमचा वाचणार नाहीस!”

हंबीरराव मोहिते :

“आज वाचलास, सर्जाखान! पण एक लक्षात ठेव—आमचा एक शिपाई तुझ्या दहा शिपायांना भारी आहे. नारोबा, लागल्या हातानं त्यांचं कांड करून टाकू. कृष्णाकाठची ही सर्जाखानाची विखारी ढाल मुळासकट उपटून काढू!”

शिपाई :
“होय, सरदार! त्या सर्जाखानाला इथंच गाडू.”

हंबीरराव मोहिते :
“चला रे पोरांनो! माझा शंभूराजा तिकडे वाट पाहतोय. अजून अशी कितीतरी मैदानं मारायची आहेत. या वैऱ्यांना संपवून जन्माचं सार्थक करू!”
[“हर हर महादेव!” म्हणत सर्वजण निघून जातात.]

पुढील दृश्य (रायगड दरबार)

संभाजी राजे :
“पहाडासारखे आमचे आबासाहेब आम्हाला सोडून गेले, तेव्हाही आम्ही इतके हादरलो नव्हतो. कारण पित्यासमान असणाऱ्या मामासाहेबांनी ती पोकळी कधी जाणवू दिली नाही. पण आज तोच आधार निखळला... आता आम्ही कुणाकडे पाहायचं?”

येसाजी कंक :
“राजे, ही जगाची रीत आहे. जुने जातात, नवे घडतात. धनाजी, संताजी यांसारखी तरुण मंडळी आहेत—त्यातून घडवू नवे हंबीरराव!”

संभाजी राजे :
“औरंगजेबासारखा शत्रू चारही बाजूंनी डाव टाकतो आहे. अशा वेळी, स्वराज्याच्या सरसेनापतीपदासाठी आम्ही म्हाळोजीबाबांना ही जबाबदारी देत आहोत.”

म्हाळोजी :
“राजे, आमच्या जीवात जीव असेपर्यंत स्वराज्याचं रक्षण करू!”

संभाजी राजे : "म्हाळोजीबाबा, आज या क्षणापासून तुम्ही स्वराज्याचे सरसेनापती आहात."

प्रल्हाद निराजी : "म्हाळोजींसोबत आम्ही आहोत, राजे. वेळ बाका आहे. पुढील कामगिरीसाठी निघालं पाहिजे. शत्रू दिवसेंदिवस जवळ येत आहे."

संभाजी राजे : "होय, निराजीबाबा. आपल्या सारख्या अनुभवी बुजुर्गांवरच हे स्वराज्य उभं आहे. आबासाहेबांनंतर आपण सर्वांनी स्वराज्याची घडी बसवली. त्याबद्दल तुमच्या सर्वांचे आभार मानायला आमचे शब्द अपुरे पडतील!"

म्हाळोजीबाबा : "शंभूराजे, हे स्वराज्य आम्हा सर्वांचं, आपल्या रयतेचं आहे. त्यात आभार काय मानायचे?"

संभाजी राजे : "म्हाळोजीबाबा, स्वराज्याला चारही बाजूंनी यवनांनी घेरले असताना, जवळची माणसं स्वराज्याला सोडून परकीयांना सामील झाली. ज्या कारभाऱ्यांवर विश्वासाने राज्यकारभार सोपवला, त्यांनीच आमच्याशी गद्दारी केली. आमच्या अन्नात विष कालवलं. अशा वेळी आपण सर्वांनी आम्हाला सावरलं, आपल्या मुलासारखं आमच्यावर प्रेम केलं. या हिंदवी स्वराज्याचे खरे शिलेदार आपण आहात. अशावेळी आभार मानू तर काय करू आम्ही, म्हाळोजीबाबा?"

म्हाळोजीबाबा : "आता झालं गेलं गंगेला मिळालं. राजे, आम्हांस पुढील कामगिरीची आज्ञा द्यावी."

येसाजी कंक : "होय, राजे. पुढील कामगिरीसाठी आम्हांला आज्ञा द्यावी."

संभाजी राजे : "ठीक आहे. म्हाळोजीबाबा, सैन्य तयार ठेवा. देऊ धडक त्या औरंग्याला!"

म्हाळोजीबाबा : "जी राजे!"
[मुजरा करून सर्वजण निघतात]

संभाजी राजे : "येसू, स्वराज्याचा एक शिलेदार गेला. माझा हंबीरगड गेला. फार वाईट झालं. अहोरात्र स्वराज्यासाठी अखंड आयुष्य दिलं. आज आम्ही अजून पोरके झालो."

येसू : [जवळ जाऊन] "राजे, आज सर्व रयत दुष्काळात असूनही आपल्या पाठीशी उभी आहे. निघेल याच्यातूनही मार्ग. आपण राजे आहात, असं दुःख करून चालणार नाही. काळ या स्वराज्यावर केव्हा घाला घालेल याचा नेम नाही. आपण या दुःखातून सावरलं पाहिजे आणि रयतेलाही धीर दिला पाहिजे, राजे."

संभाजी राजे : "होय, येसू! पण दैवानं आम्हांस इतकं का पोरकं करावं? आम्ही या जगात आलो ते पोरकेच."

येसू : "असं का बोलता, राजे? आम्ही आहोत ना आपल्या बरोबर."

संभाजी राजे : "पाहा ना, राणीसाहेब. आम्ही नासमज असतानाच आमच्या मासाहेब आम्हांस सोडून गेल्या. आऊसाहेबांनी आमचं पालनपोषण केलं. आबासाहेबांच्या प्रेमासाठी आम्ही कित्येक दिवस तरसत राहिलो. तेही सोडून गेले. आज मामासाहेबही सोडून गेले. विश्वासाच्या माणसांनी दगा दिला. आमच्यावर सर्व बाजूंनी संकटांचं आभाळ कोसळलं आहे. अशावेळी मी काय करू, येसू?"

येसू : [खांद्यावर हात ठेवून] "राजे, आपण शूर, पराक्रमी आहात. आपल्या पराक्रमाची नांदी आपण आग्रा भेटीतच त्या औरंगजेबाला दाखवली आहे. मराठ्यांचा एकही किल्ला पडत नाही. ते आपल्याला क्षीण करू शकत नाहीत. म्हणूनच तो आपल्याला घाबरून दक्षिणेला आला. याची जाणीव आपणास

आहे. पूर्ण हिंदुस्तानात औरंगजेबाशी टक्कर एकच देऊ शकतो — तो शिवपुत्र संभाजीराजे!"

संभाजी राजे : [डोळे पुसत, येसूकडे पाहत, थोडावेळ थांबून] "येसू, आज तू माझ्यातील अग्नी जागा केलीस. आता येऊ दे त्या औरंगजेबासारखे हजारो शत्रू! हा शिवपुत्र संभाजी या मराठी मातीसाठी, हिंदवी स्वराज्यासाठी आपले प्राण देण्यास कधीही तयार आहे."

येसुबाई : [जवळ जाऊन, खांद्यावर हात ठेवून] "राजे, आपल्या पराक्रमावर आणि शिवराय-मासाहेबांच्या पुण्याईवरच हा महाराष्ट्र आज उंच ताठ मानेने उभा आहे."

संभाजी राजे : "येसू, इतके दिवस तू रायगडचा कारभार जातीनिशी सांभाळलास. अजून काही दिवस सांभाळलास, तर आम्ही त्या औरंग्याला आसमान दाखवू. त्या औरंग्याला एकदाचं या शिवपुत्र संभाजीची ताकद काय आहे हे दाखवायचा विचार आम्ही पक्का केला आहे. त्यासाठीच आज आम्ही सर्व सरदारांना दरबारात बोलावून पाठवलं आहे. आबासाहेबांनी साठवलेल्या खजिन्याची आम्ही उधळपट्टी केली नाही. म्हणूनच वैऱ्याच्या सेना-सागराला आज सहा वर्षे सामना करू शकलो. दुर्दैवानं सतत तीन वर्षे दुष्काळ असूनही रयत या संभाजीच्या पाठीशी पहाडासारखी उभी राहिली. त्यांचे कसे आभार मानू, आम्हांस कळत नाही, येसू."

येसुबाई : "दुर्दैवानं सतत तीन वर्षे दुष्काळ असूनही आपण जिद्दीने झुंजत आहात, त्याला तोड नाही, राजे! या पातशाहाला यापूर्वी असं कधीच कुणी हैराण केलं नव्हतं. ते ह्या शिवपुत्र संभाजींनी करून दाखवलं; त्याला जेरीस

आणलं. अजून काही दिवसांतच तो या महाराष्ट्राच्या छाव्यांना घाबरून पळून जाईल."

संभाजी राजे : "पण... येसू..."
[तेवढ्यात म्हाळोजी, सूर्याजी, कवी कलश एका बाजूने व संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडो बल्लाळ दुसऱ्या बाजूने प्रवेश करतात व मुजरा करतात]

संभाजी राजे : "या, म्हाळोजीबाबा. बरं झालं, अगदी वेळेवर आलात. आम्ही आपलीच सर्वांची वाट पाहत होतो."

म्हाळोजी : "राजे, एकदाची झडप घालू या त्या औरंग्याच्या!"

संभाजी राजे : "थांबा, म्हाळोजीबाबा. हे निर्णायक युद्ध आता सह्याद्रीच्या डोंगरकपारीत आणि त्याच्या पायथ्याच्या मुलुखातच खेळू. त्यासाठी आम्ही खानदेश, बागलाण, नाशिक भागातील बहुतांश फौजा काढून घेतल्या आहेत आणि सारं सैन्य सह्याद्रीकडे वळवलं आहे. पन्हाळा, शिरवळ, पुणे, चाकण, पनवेल, चौल, हरिहरेश्वर ते पुन्हा संगमेश्वरहून विशालगड, पन्हाळा — असा पोलादी कडा आपण बांधत आहोत. आपला हा चक्रव्यूह भेदून माणूसच काय, मुंगीही आत प्रवेश करू शकणार नाही. हा कडा असा शिस्तीनं आणि जिद्दीने झुंजत ठेवू, की तो बुढ्ढा पातशहा इथंच पूर्ण आयुष्य लढत राहील!"

कवी कलश :
“वा राजन, अद्भुत योजना!”

संभाजी राजे : "कविराज, पन्हाळा आणि विशालगडाचा जंगली परिसर म्हणजे आमच्या राज्याचा पोलादी बाहू आहे. तुम्ही तिकडे दक्ष राहा. पहारे जागते ठेवा."

कवी कलश : "राजन, आपण निश्चिंत असा. माझ्या घोड्यांनी आजपर्यंत कधीही पराभव पाहिला नाही. मलकापूरची पागा हे माझं सामर्थ्य आहे. राजे, काव्यानंदाच्या कैफात आपल्या संगतीने मी सरस्वतीचा देव्हारा उजळून टाकला होता. राजे, तुमच्यासंगे जगण्यात मला नेहमीच मोठी मौज वाटली. आपल्यासाठी मरण्यातही सुखाचा स्वर्ग संपादन करू!"

संभाजी राजे : "कविराज, आपण स्वराज्याचे पाईक आहात, हे आम्हाला चांगलं माहीत आहे."

[संभाजी राजे धनाजीकडे पाहतात. तेव्हा धनाजी हसतात.]

धनाजी जाधव :
“राजे, गोमीला कितीही पाय असले तरी कंबरड ठेचलं की ती संपते. आम्हाला जी जबाबदारी दिलीय, तिचं सोनं करू. या मातीसाठी मरणही स्वीकारू!”

संभाजी राजे : [संताजीला जवळ बोलावून]
“संतोबा, तुझ्यावर आमचा दांडगा भरवसा आहे. नुकताच तू जिंजीपर्यंतचा दौरा करून आलास. जिंजीऱ्याची पाण्यातली मगर किती जहरी आहे, हे आम्हाला पुन्हा सांगायची गरज नाही. तो सिद्दी फार लुच्चा आहे—ऐनवेळी दगाफटका करेल. म्हणूनच हरिहरेश्वरपासून पनवेलपर्यंत धावते राहा.”

संताजी :
“राजे, या किनारपट्टीची चिंता सोडा. आपण ही जबाबदारी माझ्यावर सोपवलीत, मी धन्य झालो. तुमचा विश्वास आम्ही सार्थ करून दाखवू. प्रसंगी त्या सिद्दीला बिळातच कोंडून ठेवू!”

संभाजी राजे : [सर्वांकडे नजर फिरवत]
“दोस्तहो, वाटतं का तुम्हांला—हा भयप्रद पर्वत ओलांडून आपण पुढे जाऊ शकू?”

खंडो बल्लाळ :
“का नाही, राजे! आपण खूप भोगलं, खूप सोसलं. सह्याद्रीतील एकही किल्ला आपण त्या औरंगजेबाच्या तावडीत जाऊ दिलेला नाही. आरमारातील एकही जहाज कमी झालेलं नाही—उलट त्यात साठ-सत्तर मोठ्या जहाजांची भर पडली आहे. एवढी ताकद आपल्या पाठीशी असताना, एकच काय—पन्नास वर्षेही त्या औरंग्याच्या सेनासागराशी आपण मुकाबला करू!”

संभाजी राजे :
“गड्यानो, औरंगजेबासारख्या कळीकाळाशी सामना करण्यासाठी जे शक्य होतं ते सर्व आम्ही केलं. तुमच्याच साथीनं जिंजीरेकर सिद्दीला ठेचून काढलं—तो इतका घाबरला की बाहेर पडायलाही धजावला नाही.
गोव्यातील पोर्तुगीजांची मस्ती जिरवली, इंग्रजांना वखारीतच खिळवून ठेवलं.
कर्नाटक-तामिळ भागात मोहिमा काढून गडकिल्ल्यांवर भगवा फडकवला.
विजापूर-गोवळकोंड्यांशी दोस्ती करून दिल्लीला कोंडलं.
पाच लाखांचा सेनासागर असूनही त्या औरंग्याला आठ-आठ वर्षे नाचवलं!
तुमच्या साथीनं महाराष्ट्र वाचवला!”

[सर्वजण: “वा! राजे वा!”]

संभाजी राजे : [डोळ्यांत ज्वाला, मुठ आवळून]
“एका शिवाजीराजांच्या लौकिकासाठी आणि या महाराष्ट्राच्या मातीसाठी,

अशा शंभर संभाजींच्या मुंड्या रणांगणावर पडल्या तरी बेहत्तर!
चला मर्दांनो—बोला… हर हर महादेव!”

[सर्वजण “हर हर महादेव!” म्हणत निघून जातात.]

मुखरब खान :
“गणोजी राजे, संगमेश्वरला पोहोचायला अजून किती वेळ लागेल?”

गणोजी शिर्के :
“खानसाहेब, उद्या सकाळपर्यंत आपण संगमेश्वरला पोहोचू.”

इखलास खान :
“खानसाहेब, कुठल्या या मरणाच्या खाईत घेऊन चाललात आम्हाला?”

मुखरब खान :
“मी आधीच सांगितलं होतं—ज्यांना मरायचं आहे त्यांनीच माझ्यासोबत यावं!”

गणोजी शिर्के :
“खानसाहेब, मी तुम्हाला वाघाच्या घळीपर्यंत आणलं. माझे वाटाडे, रसद सगळं देतोय. पण मला इथून मागे जाण्याची परवानगी द्या.”

मुखरब खान : [रागाने]
“तू वेडा झाला आहेस का, गणोजी? आता मागे फिरणं नाही!”

गणोजी :
“या डोंगरदऱ्यातील लोक शिवाजी आणि संभाजीला देव मानतात. जर संभाजी हातातून निसटला, तर तो आमचं काहीही शिल्लक ठेवणार नाही!”

मुखरब खान :
“घाबरू नकोस! पण आता परतणं शक्य नाही—तुला आमच्यासोबत यावंच लागेल!”

गणोजी शिर्के : "पण सरकार, माझे वाटाडे आणि रसद — सारा बंदोबस्त तुमच्या सेवेला देतो. माझ्यावर दया करा. मला इथून मागे जाण्याची परवानगी द्या."
[गणोजी हात जोडून बोलत होता. मुखरब खान भयंकर चिडून गणोजीची गळपट्टी धरतो.]

मुखरब खान : "शिर्के, तू मला बेवकूफ समजतोस का? मैं तो मरूंगा, लेकिन आपको साथ लेकर ही मरूंगा. चलो, बचपना छोड़ दो! संभाजी निकल गया तो ये मराठे हमें जिंदा नहीं छोड़ेंगे."
[भराभर सर्वजण निघून जातात.]

पडदा...

[संगमेश्वरच्या वाड्यात संभाजी राजे न्यायनिवाडा करण्यासाठी बसलेले असतात. समोर गरिब जनता, अर्जोजी यादव तसेच येसूबाई, म्हाळोजी, संताजी, धनाजी, खंडो बल्लाळ इत्यादी उपस्थित असतात.]

संभाजी राजे :
"बोला यादव, काय असेल ते थोडक्यात सांगा. आम्हांला तात्काळ रायगडावर निघायचं आहे. रात्र वैऱ्यांची आहे—स्वराज्य संकटात आहे."

[शिपाई येतो]
"राजे, पालखी तयार आहे."

संभाजी राजे : [येसूबाईंकडे पाहत]
"राणीसाहेब, आपण पुढे निघा… आम्ही लगेच येतो मागून."

येसूबाई :
"नाही राजे, आपणाला मागे ठेवून आम्ही इथून निघणार नाही."

संभाजी राजे :
"राणीसाहेब, आमची काळजी करू नका. आम्ही धावत्या घोड्यावरून तुमच्या मागोमाग येऊ."

येसूबाई :
"राजे, आजचा दिवस आम्हाला अशुभ वाटतोय… नका थांबू इथे."

संभाजी राजे :
"येसू, असं कसं चालेल? आम्ही या मुलखाचे राजे आहोत.
टाहो फोडणाऱ्या लेकराकडे पाठ फिरवून आई पुढे जाऊ शकत नाही…

तसंच, न्यायासाठी दारात उभ्या असलेल्या रयतेला ओलांडून राजा पुढे जाऊ शकत नाही!”

येसूबाई :
“पण राजे, तुम्हाला सोडून माझं पाऊल पुढे पडत नाही.”

संभाजी राजे : [हलके हसत, समजावत]
“आज काय झालंय तुला, येसू?
अख्खा महाराष्ट्र आपल्या करड्या शिस्तीत ठेवणारी आमची महाराणी…
आणि आज अशी हळवी झालीस?
कुठे गेला तुमचा तो दरारा, तो धाक?”

“येसू, आम्ही शब्द देतो—तुमच्या मागून आम्ही येतोच.
तुमच्यासोबत आठशे घोडेस्वार निघतील.”

येसूबाई :
“इतके कशाला? मग आपणासोबत कोण?”

संभाजी राजे :
“चारशे घोडेस्वार आमच्यासोबत आहेत.”

येसूबाई :
“राजांचे रक्षण महत्त्वाचं आहे… आपल्यासोबत जास्त सैन्य पाहिजे.”

संभाजी राजे :
“आता वेळ घालवण्यात अर्थ नाही. नाहीतर आपण सारेच मुघलांच्या जाळ्यात अडकू.”

[येसूबाई जड अंतःकरणाने निघतात. मागे वळून पाहतात.]

संभाजी राजे :

“एवढी चिंता कशाला करतेस, येसू?
सह्याद्रीचं हिरवं रान, ही तांबडी माती…
या शिवपुत्र संभाजीला दगाफटका करेल असं वाटतंय का तुला?”

“दुपारी तुमची पालखी चिपळूणला, वशिष्ठी नदीकाठी पोहोचेल…
तुम्ही तोंडात घास घालता तोपर्यंत आम्ही तिथे हजर राहू!”

[येसूबाई निघतात. तेवढ्यात हेर धावत येतो.]

हेर :

“राजे… घात झाला!
वैरी संगमेश्वरावर चालून येतोय!
हजार-बाराशे स्वारांचा लोंढा स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलाय, राजे!”

संभाजी राजे :

“पाखऱ्या…!”

[घोडा समोर येतो. कवी कलश तलवार घेऊन धावतात. मागून घोष]

आवाज :

“अल्ला हो अकबर!”
“दीन! दीन!”

मराठे :

“हर हर महादेव!”
“शिवाजी महाराज की जय!”
“संभाजी महाराज की जय!”

[मुघल सैन्य आणि मराठे भिडतात. भीषण युद्ध.]

म्हाळोजी घोरपडे, संताजी, धनाजी, कवी कलश, खंडो बल्लाळ

⟶ मुघलांवर तुटून पडतात.

मुखारब खान व इखलास खान

⟶ माघार घेतात.

[लढाईत अचानक हल्ला]

(मंच सूचकता)

⟶ मुखारब खान संभाजी राजांवर मागून वार करतो…

⟶ **म्हाळोजीबाबा तो वार स्वत:वर झेलतात!**

म्हाळोजीबाबा :
"राजे… पुढे निघा… स्वराज्य वाचवा!"

[ते धरातीर्थी पडतात.]

संभाजी राजे : [भावूक पण निर्धाराने]
"म्हाळोजीबाबा… तुमचं बलिदान व्यर्थ जाणार नाही!"

[राजे पुढे निघतात. रणशिंग, घोड्यांच्या टापा, युद्धाचा आवाज…]

पडदा….

[दृश्य – गावातील माळ. गावकऱ्यांचा घोळका. सगळे कुजबुजत, हळहळत उभे. हे पाहून धनगरांची पोरं — पिऱ्या, झोऱ्या, बिरज्या पुढे येतात.]

गावकरी (१ला) :
"लय वाईट झालं रं...." "लय वाईट झालं रं.....

गावकरी (२रा) :
"असं व्हायला नको होतं देवा! थोरले राजे जाऊन दहा वर्ष झाली...
तोवर त्यांच्या लेकराची अशी दुर्दशा व्हावी? कुण्या चांडाळान घात केला देवा!"... *[हळहळत}*

पिऱ्या : *[पुढे येत]*
"काय पावण, एवढं कानात कुजबुजत काय बोलताय?
स्पष्ट सांगा, काय झालंय?"

गावकरी : *[डोळे पुसत, आवाज दाटून]*
"अरं पोरांनो!... आपल्या शंभूराजांचा फितुरीन घात केला!"
शंभू राजांच्या बैलासारख्या मुसक्या बांधल्या...
आणि पातशहाने फरफटत ओढून नेलं.... आपल्या राजांना!"

[क्षणभर सगळीकडे शांतता.]

"त्या नीच गणोजी शिर्क्यानं दगाफटका करून शंभूराजांना पकडून दिलं...
दुपारी ह्याच वाटेन गेले सगळे..."

[धनगरांची पोरं घाबरून एकमेकांकडे पाहतात. चेहऱ्यावर अविश्वास आणि धक्का.]

बिरज्या :
“काय सांगताय राव!
तो शिर्क्या तर दोन हिऱ्याचे व्यापारी घेऊन जातोय असं सांगत होता.
आम्हांला वाटलं, तो गण्या शिर्क्याच भेटला होता वाटेत...
त्यानेच सांगितलं होतं — ‘हिऱ्याच्या सौदागारांना घेऊन जातोय’ म्हणून...”

गावकरी : *[रडवेल्या, दाटलेल्या आवाजात]*
“नाही रे पोरा...
ते हिऱ्याचे व्यापारी नव्हते...
आपलं राजं होतं ते...
आपलं शंभूराजं...!”

पिऱ्या : *[क्षणात हादरून, थरथरत्या आवाजात]*
“ह्या वाटेन...!
म्हणजे... आम्ही पाहिलेलं ते... आपले राजे होते...?”

[डोक्यावर हात ठेवतो, विव्हळतो]

“अरं देवा काय झालं हे, आमच्या कर्मा...!”

[रडत रडत जांभळीच्या झाडाच्या बुंध्यावर डोकं आपटतो.]

[एकजण स्वतःच्या गालावर चपराक मारू लागतो. काहीजण जमिनीवर लोळू लागतात. पोरं एकमेकांना मिठी मारून रडतात. सगळं वातावरण शोकमग्न होतं.]

बिरज्या : *[हुंदका आवरत]*
"दादा... आता काय करायचं?"
"देवा मल्हारी राया... काय हा घोटाळा झाला!"

पिऱ्या : *[डोळ्यांत संताप, मुठी आवळत]*
"तो बेईमान गण्या शिर्का...!
त्याचा हा सैतानी डाव आम्हांला कळलाच नाही!"

गावकरी :
"आपल्या शंभूराजांचा त्यांच्या मेव्हण्याने घात केला रे पोरांनो…
राजांच्या बैलासारख्या मुसक्या बांधल्या…
पातशहाने त्यांना फरफटत ओढून नेलं… आपल्या राजाला…!"

बिरज्या :
"काय सांगता राव तुम्ही?
तो गण्या शिर्का आम्हाला म्हणाला होता —
'हिऱ्याचे सौदागर आहेत' म्हणून…
म्हणजे… म्हणजे आपण पाहिलं ते… आपले राजे होते?"

गावकरी : *(डोळ्यात पाणी आणत)*
"हो रे पोरा… आपलं राजं होतं ते…"

पिऱ्या : *(डोकं आपटत, हंबरडा फोडत मोठ्यांनी रडतो)*
“अरे देवा…!
आपल्या हातून काय पाप झालं रे…!
आपणच आपल्या राजाला वैऱ्याच्या हाती दिलं…!”

बिरज्या :
“दादा… आता काय करायचं?”

पिऱ्या : *(डोळ्यांत संताप, आवाज थरथरत)*
“काय करायचं विचारता?
आपण धनगराची लेकरं…!
जिवंत लांडग्याचा जबडा फाडणारी!

त्या सैतानांनी आपल्या राजाला फसवलं…
आता त्यांची हाडं मोडल्याशिवाय शांत बसणार नाही!”

झोऱ्या :
“पोरांनो…!
एक वेळ आपल्या आई-बापाला विहिरीत ढकलू…
पण आपल्या शंभूराजांच्या अंगावर
कोणी बोट ठेवणार नाही…!

त्या गण्याला जिवंत सोडायचं नाही!”

सर्वजण :
“सांग दादा…! आदेश दे!”

पिऱ्या : *(हातात काठी घट्ट पकडत)*
“चला गड्यांनो…!
त्या गण्या शिर्क्याचं मुंडकं धडापासून वेगळं करू…!
आणि आपल्या राजासाठी प्राण पणाला लावू!”

बिरज्या :
“चला…! कराडच्या दिशेनं…!
आज हिशोब चुकता करायचाच!”

(न थांबता, न थकता — ती आठ लेकरं रात्रभर धावत आहेत. कमरेला बांधलेले कोयते हलत आहेत. मुठी घट्ट आवळलेल्या. डोळ्यांत संतापाची ज्वाला.)

(कराडचा मोगलाई तळ — गाढ अंधार. सर्वत्र शांतता. फक्त रातकिड्यांचा किर्रर्र आवाज. काही शिपाई पहारा देत उभे.)

पहारेकरी :
“कोण रे तुम्ही? कुठं चाललात?”

पिऱ्या : *(निसटता आत्मविश्वास दाखवत)*
“आम्हाला गणोजी शिर्के सरकारांनी बोलावलंय जी…”

पहारेकरी :
“कुठून आलात?”

इल्या :
“आज शंभूराजांच्या शिकारीवर शिर्के सरकार आले होते…
त्यांना वाट दाखवायला आम्हीच होतो की!”

(दुसरा शिपाई त्यांच्याकडे नीट पाहतो. ओळखीचे वाटल्याने तो मोकळा होतो.)

शिपाई :
"अरे, ले जाओ इन्हें… गणोजी के पास। ये अपने ही लोग हैं…"

(तळावर गाढ शांतता. पहारेकरी गणोजीचा तंबू दाखवतो.
क्षणात त्या लेकरांच्या डोळ्यांत ज्वाला भडकते…)

सर्व धनगर लेकरं : *(एकदम तारस्वरात गर्जना)*
"बिरुबाच्या नावानं चांगभलं…!
बिरुबाच्या नावानं चांगभलं…!"

(क्षणात पहारेकऱ्यांच्या हातातील दिवट्या हिसकावून घेतल्या जातात… आणि सरळ गणोजीच्या तंबूकडे फेकल्या जातात!)

(क्षणात तंबू पेट घेतो… ज्वाळा आकाशाला भिडतात!)

मुघल शिपाई : *(घाबरून ओरडत)*
"भागो… भागो… आग लग गई…!
या अल्ला… बचाओ… बचाओ…!"

(सगळीकडे अफाट गोंधळ… धावाधाव… किंकाळ्या…)

पिऱ्या / इल्या : *(रागाने गर्जत)*
“गण्या शिर्क्या…! बाहेर ये…!
तुझी खांडोळी करतो आज…!”

*(सैनिक त्यांना वेढतात. झुंज देतात, पण शेवटी त्या लेकरांना पकडलं जातं…
तरीही त्यांच्या चेहऱ्यावर भीती नाही — फक्त जळता संताप!)*

सर्वजण (अटक होताना देखील ओरडत):
“हर हर महादेव…!
शंभूराजे अमर राहो…!”

पडदा….

(दुसऱ्या दिवशी — मुखरब खानची छावणी.
समोर जेरबंद धनगर लेकरं. बाजूला गणोजी शिर्के. वातावरण तणावपूर्ण.)

शिपाई :
“हुजूर… याच मुलांनी गणोजी आणि नागोजीच्या तंबूंना आग लावली.
यांचं काय करायचं?”

मुखरब खान : *(त्यांच्याकडे बारकाईने पाहत)*
“हाँ… मैं पहचानता हूँ इन बच्चों को…
इन्हीं ने हमें रास्ता दिखाया…
और रोटी भी दी…”

(क्षणभर विचार करून)
“छोड़ दो इन्हें…
जंगल के पंछी हैं… जंगल की तरफ ही उड़ जाएंगे…”

(जेरबंद लेकरं मुक्त होतात. थोडं पुढे चालतात.
क्षणभर शांतता... पण डोळ्यांत जळतं अंगार.)

पिऱ्या : *(दबक्या, गुरगुरत्या आवाजात)*
“लेकांनो…
या खानानं आपल्याला सोडलं…
पण आपल्या राजाला नाही…!”

(क्षणात सगळे एकमेकांकडे पाहतात...
आणि अचानक मागे वळतात!)

सर्वजण : *(तुफानी गर्जना)*
“यळकोट… यळकोट… जय मल्हार…!”

(ते खान आणि गणोजीकडे झेपावतात…
गळे पकडतात… गोंधळ उडतो!)

(मुघल शिपाई घाबरून तलवारी उपसतात…
क्षणात वारांचा वर्षाव…
एकामागोमाग एक लेकरं कोसळतात…)

[क्षणभर स्तब्ध शांतता…]

मुखरब खान : *(रागाने, पण भीती दडवत)*
“फेंक दो इन लाशों को… कोयना नदी में…!”

(गणोजी visibly घाबरलेला — हात थरथरत आहेत.)

गणोजी शिर्के :
“बघितलंत ना, खानसाहेब…
या संभाजीसाठी ही माणसं जीव द्यायलाही तयार आहेत…!

आता आमचं काम संपलं…
आम्ही इथून निघतो…
नाहीतर आमचाही जीव जाईल…”

मुखरब खान : *(थोडं हसत, आश्वासन देत)*
“फिक्र मत करो, गणोजी…

पातशाह तुम्हें जागीर देगा…
जवाहरात देगा… मालामाल कर देगा…”

गणोजी : *(घाईत, भीतीने)*
“पुढचं पुढे पाहू, खानसाहेब…
आता इथं थांबणं म्हणजे मृत्यूला निमंत्रण आहे…
आम्ही निघतो!”

पडदा….

(मंच सूचना)

(औरंगजेबाची छावणी. तो अस्वस्थपणे इकडे-तिकडे फिरत आहे. संभाजी राजे पकडले गेलेत याची त्याला अजून कल्पना नाही.)

औरंगजेब : *(चिडून, स्वतःशीच)*
“संभाजी… संभाजी… संभाजी…!
नींद हराम कर दी इसने!
कहाँ है वो दख्खन का चूहा…?”

(मंच सूचना)
(तेवढ्यात एक शिपाई धावत येतो.)

शिपाई : *(धाईत, आनंदाने)*
“हुजूर… हुजूर…!
बड़ी खुशी की खबर है — संभा गिरफ्तार हुआ!”

औरंगजेब : *(संशयाने, भुवया उंचावत)*
“क्या बकते हो?
पीकर तो नहीं आए हो?”

शिपाई :
“नहीं हुजूर!
संभा सचमुच गिरफ्तार हुआ है…
मुखरब खान ने संगमेश्वर में दबोच लिया उसे!”

औरंगजेब : *(अत्यंत आनंदाने, हात वर करत)*
“अल्लाह ताला की मेहरबानी…!
आज जश्न होगा… शब-ए-खुशी मनाई जाएगी!

आख़िर… दख्खन का चूहा हमारे शिकंजे में आ ही गया!

लाओ उसे… शान-ओ-शौकत के साथ…
पेश करो उसे हमारे सामने!”

(मंच सूचना)
(दरबार भरलेला.
संभाजी राजे — साखळदंडाने बांधलेले, पण ताठ उभे.
आजूबाजूला शस्त्रधारी सैनिक.
मुखरब खान त्यांना दरबारात आणतो.)

(मंच सूचना)
(संभाजी राजे समोर येताच — औरंगजेब तक्तावरून उठतो…
क्षणभर गुडघ्यावर बसतो… अल्लाहचे आभार मानतो.)

फौलाद खान : *(कडक आवाजात)*
“झुक जाओ… आलमगीर के सामने!”

कवी कलश : *(खणखणीत, निर्भीड आवाजात)*
“झुकेंगे नहीं…!
राजा है वो!”

मुखरब खान : *(रागाने ओरडत)*
“खामोश…!”

(मंच सूचना)
(दरबारात तणाव. संभाजी राजे साखळदंडात, पण ताठ उभे.
औरंगजेब समोर. सभोवताली शांतता.)

औरंगजेब : *(हात उंचावत)*
"चुप... चुप... सब्र करो...
बहुत कुछ पूछना है इसे..."

(मंच सूचना)
(औरंगजेब गुडघ्यावर बसतो, हात वर करून प्रार्थना करतो.)

औरंगजेब :
"या अल्लाह... परवरदिगार...!"

संभाजी राजे : *(तिरस्काराने, आव्हानात्मक हसू)*
"तख्त भी भूला... ताज भी भूला... उतर पड़ा औरंग...
शेर को देखा बकरी ने... अब उड़ गए सारे रंग!"

(मंच सूचना)
(दरबारात कुजबुज. औरंगजेब थोडा चिडतो.)

संभाजी राजे : *(चिडवत)*
"काय बादशहा...
तुम्हीही कवी आहात का?
या प्रसंगी एखादी कविता सुचते का?"

औरंगजेब : *(स्वतःला सावरत, हलकं हसत)*
“हाँ… राजन… क्यों नहीं…”

“राजन तुम हो सांझे, खूब लड़े हो जंग…
देखते तुम्हारा तेज… फीका पड़ा मेरा रंग…”

संभाजी राजे : *(उपहासाने)*
“वाह! बहुत खूब…!”

औरंगजेब : *(अचानक संतापून)*
“खामोश… जहन्नमी…!
नौ बरस का था तू… जब आगरा में मिला था मुझे…
तब भी नहीं झुका…!

क्यों संभा…
डर नहीं लगता तुझे हमसे?”

संभाजी राजे : *(डोळ्यांत ज्वाला, ठाम आवाजात)*
“हमें किसी का डर नहीं लगता…
हमसे डरते हैं सब…!”

औरंगजेब : *(रागाने)*
“खामोश!
जो पूछता हूँ… सिर्फ उसका जवाब दो…

कहाँ है खजाना?
कहाँ छुपाई है दौलत?”

संभाजी राजे : *(ताठ, गर्वाने)*
“हिंदुस्तान हमारा खजाना है…
इथली मातीच आमचं सोन आहे!

तू लुटलास हा देश…
पण आम्ही तुझ्यासारखे भिकारी नाही!

हिंदुस्तान भिक देतो — तुझ्यासारख्यांना…
पण आम्ही घेत नाही!

आम्ही घेतो —
तलवारीच्या धारेवर…
मनगटाच्या जोरावर!

आम्ही आहोत —
छत्रपती शिवरायांचे पुत्र!”

(मंच सूचना)

(दरबारात पूर्ण शांतता.
औरंगजेब स्तब्ध… संभाजी राजांकडे पाहत राहतो.)

औरंगजेब :
“कुछ तो संयम है... ये मरहट्टे, ये मरहट्टे क्या खिलाते हैं अपने बच्चों को?
हमारे जनाने में क्यों पैदा नहीं हुआ एक भी ऐसा शख्स...?”

संभाजी राजे :
“औरंगजेब, तुझ्यासारख्या नादानाच्या पोटी संभाजी कसा जन्माला येईल?
तो जन्माला येतो छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोटी... आणि महाराष्ट्राच्या पवित्र मातीत!”

औरंगजेब :
“खामोश! बता संभा... बता... कौन-कौन सरदार शामिल थे तुम्हारे साथ?”

संभाजी राजे :
“तख्तासाठी स्वतःच्या रक्ताशी गद्दारी करणारी जात नाही आमची!
ही मातीच आमचं इनाम आहे!
आम्ही आई भवानीचे वीर पुत्र आहोत!

लक्षात ठेव— तू महाराष्ट्राच्या मातीत उभा आहेस!
इथली मातीच तुझं अस्तित्व गिळून टाकेल!

आमच्या वाटेवर येऊन वाटमारी करणाऱ्यांची,
त्यांच्या वाटेवर जाऊन वाट लावल्याशिवाय आम्ही थांबत नाही—
हा आमचा इतिहास आहे!”

[औरंगजेब थक्क होऊन संभाजी राजांकडे पाहत राहतो.]
[संभाजी राजे काहीही बोलायला तयार नाहीत हे पाहून, औरंगजेब हुल्लाखानाला जवळ बोलावतो आणि कानात काहीतरी सांगतो.]
[ताडकन उठून निघून जातो.]

{तुरुंगाचा पडदा}

रुहुल्लाखान : [जवळ येत, मवाळ आवाजात]
“अजून वखत बाकी आहे, संभा… तुझं वय तरी किती? फक्त बत्तीस!
आमच्या पातशहाची मर्जी राखलीस, तर अजून ही प्यारी जिंदगी वाचवू
शकशील… ऐक माझं!”

कवी कलश : [दरडावत]
“करून करून काय करणार रे तुझा तो हलकट पातशहा?”

रुहुल्लाखान : [धमकी देत]
“पागल मत बनो!
या बंदिखान्यात भुकेले कुत्रे सोडले जातील…
ते तुमच्या रक्त-मांसाचे लचके तोडतील!”

कवी कलश : [उपहासाने]
“म्हणजे आपल्या मदतीला पातशहा आपल्या ‘भावांनाच’ बोलावणार तर!
रुहुल्लाखान साहेब… या जरा इधर!”

[संभाजी राजे हलकेच हसतात.]
[कवी कलश त्याला जवळ बोलावतात आणि अचानक त्याच्या तोंडावर थुंकतात.]

[रुहुल्लाखान संतापतो, कमरेतून जांबिया काढतो; पण स्वतःला आवरतो.]

रुहुल्लाखान : [स्वर बदलत, भावनिक दबाव आणत]
“संभा… बेटे… तुझ्या वयाचे दोन लेकरं आहेत माझी…
त्यांची कसम खाऊन सांगतो—
कशासाठी सोन्यासारखी जिंदगी वाया घालवतोस?”

संभाजी राजे : [शांत पण तिरस्काराने]
“खान साहेब… आम्हांला तुमच्या पातशहाची खूप दया येते.”

रुहुल्लाखान :
“क्यू…?”

संभाजी राजे : [डोळ्यात तुच्छता, आवाज ठाम]
“एखाद्या लंगड्या कुत्र्याला हिऱ्यामाणकांचे हार घातले,
आणि अंगावर सोन्याची झूल टाकली—
तरी तो सिंहासनावर नाही पोचत…
तो शेवटी आपल्या धनीच्या पायाशीच लोळतो!”

रुहुल्लाखान :
“तोबा… तोबा… संभा! कैसी बातें करते हो?
आलमपनाह की बराबरी… एक कुत्ते के साथ?”

संभाजी राजे : [ताठ उभे, तिरस्काराने]
“हो… कुत्र्यालाही एक दर्जा असतो!
तुझ्या पातशहापेक्षा ते गरीब जनावर कितीतरी नेक… आणि वफादार असतं!”

[रुहुल्लाखानाच्या कपाळावर घाम फुटतो. तो चिडून, पाय आपटत निघून जातो.]

[अंधाऱ्या रात्रीचा फायदा घेत, राजांवर प्रेम करणारा मियॉखान हळूच प्रवेश करतो.]
[संभाजी राजांची अवस्था पाहून तो व्याकूळ होतो. त्यांच्या पायांवर कोसळतो.]

मियॉखान : [रडत]
"राजे...! काय वाट्टेल ते करून तुमच्या या बांध्या सेवकाने तुम्हांला
बहादूरगडाच्या या पोलादी कुसाबाहेर काढलं असतं... पण...!"

संभाजी राजे : [मृदू आवाजात]
"मियॉखान...!"

मियॉखान :
"होय, शंभूराजे! इथून बाहेर पडणं अशक्य आहे...
या भुईकोटाच्या चारही बाजूंना शंभर-शंभर कोसांपर्यंत
फक्त मोगलांचाच अंमल आहे!

जुलमी पातशाहाने कोणत्याही मराठ्याच्या पागेत घोडा ठेवू दिलेला नाही...
तरण्या पोरांना गावागावांतून झोडपून काढलं आहे...
अनेकांना पळवून लावलं आहे...
सगळा मुलुख शत्रूच्या ताब्यात आहे!"

संभाजी राजे : [शांत, पण अतिशय ठाम आवाजात]
"जाऊ दे, खानसाहेब...
जिंदगीचं एवढं काय कौतुक करायचं?

काही माणसांचे जन्मच असे असतात—
ते जगण्यासाठी नव्हे… तर मरणासाठी घडलेले असतात!

अशी माणसं जगून नव्हे…
तर आपल्या मरणानेच मोठी होतात!

आणि… त्या मार्गासाठीच
जगदंबेने आमची निवड केली आहे—
त्यात दोष तरी कोणाला द्यायचा?"

मियॉखान : [हळू आवाजात, आजूबाजूला पाहत]
"राजं… देवाप्पानं चिठ्ठी दिलीय."

[तो कमरेतून चिठ्ठी काढून आदराने राजांच्या हाती देतो.]
[ही चिठ्ठी रायगडावरून, येसू महाराणींचा निरोप आहे हे सांगतो.]

[चिठ्ठी वाचताना संभाजी राजांच्या डोळ्यांत अश्रू दाटून येतात.]

संभाजी राजे : [भावुक पण ठाम आवाजात]
"मित्रा मियॉ… आमच्या राणीसाहेबांना एवढाच निरोप पोचव—

अशाच हिंमतीने उभ्या राहा!
आमच्याकडून पुढील इशारा येईपर्यंत
सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरचे आपले अजिंक्य, बेलगाम किल्ले
कोणत्याही परिस्थितीत गमावू नका!

आमच्या काळजीने तुम्ही व्याकूळ झाला असाल…
पण आमची चिंता करू नका.

आमच्या आबासाहेबांनी या महाराष्ट्राच्या भाळावर
हिंदवी स्वराज्याचं गोंदण कोरलं आहे!
त्यासाठी कित्येक वीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे!

हे स्वराज्य टिकवण्यासाठी—
महाराणी, प्रसंगी आपल्या कपाळाचं कुंकू पुसण्याचीही तयारी ठेवा!

पण…
कुठल्याही परिस्थितीत गड-दुर्गांचा ताबा
दुश्मनाच्या हाती जाऊ देऊ नका!"

मियॉखान : [डोळे पाणावलेले]
"राजं… केवढं मोठं हृदय तुमचं!
केवढं अपार प्रेम तुमच्या रयतेवर!"

[थोडं थांबून, हळू आवाजात]
"राजं, दुश्मनाच्या गोटातून एक बातमी आहे…
दुर्गा राणीसाहेब, आपली राजकन्या कमलजा
आणि राणू आक्का—
यांना पातशहा आपल्या भेटीसाठी पाठवणार आहे."

[इकडे-तिकडे पाहत]
"राजं, फार वेळ झाला…
दुश्मन येण्याआधी मी निघतो!"

संभाजी राजे :
“ठीक आहे, मियॉ…
तुमचे उपकार आम्ही कधीच विसरणार नाही.”

[मियॉखान आजूबाजूला पाहत, सावधपणे निघून जातो.]

संभाजी राजे : [कवी कलशांकडे पाहत, हलकेसे हसत]
“कविराज…
औरंगजेबाची पुढची चाल पाहिली का?

बंदिखान्यात—
आमची पत्नी दुर्गा,
आमची कन्या कमलजा
आणि बहिण राणू आक्का—
यांची दहा वर्षांनी भेट घालतो आहे!

पातशहाला वाटतं—
कदाचित संभाजी बदलेल…
आणि त्याचं काम साधेल!

पण…
बदललो तर आम्ही ‘शिवपुत्र संभाजी’ कसले!”

[अचानक पडद्यामागून हाक येते —]
“शंभू…! बाळराजा…! बाळराजा…!”

[हा आवाज कानावर पडताच संभाजी राजे दचकून उभे राहतात.]
[खूप वर्षांनी हे आपुलकीचे शब्द ऐकून त्यांचे डोळे पाणावतात.]

[राणू आक्का धावत येऊन त्यांना मिठी मारतात.]
[दुर्गाराणी आणि लहान कमलजा राजांना बिलगतात आणि धाय मोकळून रडू लागतात.]

[क्षणभर संपूर्ण वातावरण स्तब्ध—सगळेच हुंदके देत रडत आहेत.]
[संभाजी राजेही अश्रूंनी ओलेचिंब होतात... पण स्वतःला सावरतात.]

संभाजी राजे : [आवाज थरथरत, पण संताप दाटलेला]
"राणू आक्का...
किती दुर्दैवी काळ आला आहे हा!

या दुर्दैवाने आम्हांला कोठून कोठे आणून उभं केलं...
नाहीतर—
आक्का साहेब, आमचा विचार काही वेगळाच होता!

त्या औरंग्याची कातडी सोलून,
त्यात भुसा भरायचा...
आणि त्याचं मांस घारी-गिधाडांना फेकायचं!

आणि या भूमीला—
माणसांना, देवाधर्माला—
त्याच्या जुलमातून मुक्त करायचं होतं आम्हांला!"

राणूआक्का : [डोळ्यांतून अश्रू वाहत]
“शंभूराजे… काय बोलावं तेच समजत नाही!
मनात नेहमी वाटायचं—
एक ना एक दिवस हा दुष्टकाळ संपेल…

आणि त्या दिवशी—
आम्ही रायगडावर येऊ…
आणि सुवर्णसिंहासनावर बसलेल्या आमच्या बंधुराजांना
डोळे भरून पाहू!”

संभाजी राजे : [हळू, रडवेल स्वरात]
“माफ करा, आक्कासाहेब… आणि दुर्गाराणी साहेब…
आम्ही तुमच्यासाठी काहीच करू शकलो नाही…”

राणूआक्का : [समजूत घालत, प्रेमाने]
“असं बोलू नका, राजे!
खूप… खूप लढलात तुम्ही!

भरलेल्या मेघासारखे कोसळलात—
विजांच्या कडकडाटासह त्या पापी औरंग्यावर तुटून पडलात!

[राजांच्या केसांवरून हात फिरवत]
राजे… हेही दिवस जातील…
आपण शांत राहा…”

संभाजी राजे : [दुःखाने, आक्कांकडे पाहत]
“आक्कासाहेब…
काळाने असे कठोर तडाखे आमच्यावरच का मारावेत?

या आमच्या लेकीला—
आम्ही याआधी कधीच भेटलो नाही…”

[कमलजाला मिठी मारतात. दुर्गाचा हात हातात घेतात.]

“दुर्गा…
एक स्त्री म्हणून… एक पत्नी म्हणून नव्हे,
तर एक माणूस म्हणूनही—
आम्ही तुम्हांला कोणतंच सुख देऊ शकलो नाही…”

दुर्गा : [डोळ्यांत अभिमान, आवाज ठाम]
“शंभूराजांची पत्नी…
आणि शिवरायांची सून—

या दोन शब्दांचा लोकांकडून मिळणारा मान,
हा स्वर्गसुखापेक्षाही कमी नाही, राजे!”

[बाहेरून कडक आवाज येतो:]
“जल्दी करो! आप सबके पास वक्त बहुत कम है!”

राणूआक्का : [संतापाने]
“काय हवं आहे त्या राक्षसाला अजून?”

संभाजी राजे : [शांत, पण कडवट हसू]
“पातशहाने अनेकदा निरोप पाठवला आहे…
तुमच्यासकट आम्हांलाही जीवदान द्यायला तो तयार आहे.”

राणूआक्का आणि दुर्गा : [एकदम, चिंतेने]
“पण… कशाच्या बदल्यात?”

संभाजी राजे : [ताठ उभे, आवाज कठोर होत जातो]
“आम्ही—
स्वराज्यातील सर्व महत्त्वाचे किल्ले, दुर्ग…

त्यांचे किल्लेदार इथे बोलावायचे,
आणि त्या सर्व किल्ल्यांच्या चाव्या—
पातशहाच्या अमलदारांच्या हाती द्यायच्या!

आणि…
हा आपला मुलुख, ही पवित्र माती सोडून—
दूर निघून जायचं!

हिंदुस्थानच्या कोणत्याही भागात—
पातशहा आम्हांला जहागीर देईल…
असं त्याचं म्हणणं आहे!”

दुर्गा : [आवेशाने, जवळजवळ ओरडत]
“नाही! नाही!! अजिबात नाही!
स्वतःचा प्राण गेला तरी—
एकही किल्ला शत्रूच्या हाती देऊ नका, राजे!”

राणूआक्का : [ठाम आवाजात]
“आबासाहेबांच्या वचनापासून कणभरही फारकत घेऊ नका!”

संभाजी राजे : [उदास हसू, थोडा उपरोध]
“दुर्गाराणी…
पातशहाच्या ‘मेहरबानी’मुळेच तर इतक्या वर्षांनी भेटतो आहोत आपण!

त्याची मर्जी राखली—
तर कदाचित सुटका होईल आपली…
आणि तुम्ही सधवा म्हणून उरलेलं आयुष्य काढाल…”

दुर्गा : [जोराचा हुंदका; हात जोडून, कळवळून]
“नका, राजे…!
थट्टेतही असं बोलू नका!

आमच्या मामंजीसाहेबांच्या ध्येयस्वप्नापुढे
सधवेपणाची काय किंमत?

आम्ही आमचं उरलेलं आयुष्य—
कसंही काढू…
पण स्वराज्याशी तडजोड करणार नाही!”

राणूआक्का : [भावनांनी दाटलेला, पण ठाम स्वर]
“खरं आहे, शंभूबाळ!
आमचे प्राण वाचोत की जावोत—
त्याची पर्वा नाही!

पण आमच्या जीवाच्या मोहापायी
आबासाहेबांच्या इभ्रतीला धक्का पोहोचेल
असा कोणताही कौल-करार
त्या औरंग्यासोबत करू नका!”

कवी कलश :
“दुर्गाभाभी… राणूआक्का…
या मातीसाठी, हिंदवी स्वराज्यासाठी,
सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांतून, दऱ्याखोऱ्यांतून
आजही औरंग्याशी जंग लढणाऱ्या आमच्या साथीदारांना
या कलशाचा एकच सांगावा द्या—

फाँसी की फाँस गले से लगाया,
चले हम मौज की चाल सदा ही।
जानि परै अजहूँ पग के तल,
लोहे की कील सतेज गड़ी ही॥

(क्षणभर थांबून, उंच आवाजात)
“मरण आमच्यासाठी भीती नाही…
स्वराज्यासाठी दिलेला प्रत्येक श्वास — हीच आमची शान आहे!”

संभाजी राजे :
(कंठ दाटलेला, पण डोळ्यांत ज्वाला)
“कविराज…
आपण शब्दांनी जे सांगितलं,
ते आम्ही रक्ताने लिहू!

या देहाचा अंत होईल,
पण स्वराज्याचा श्वास कधीच थांबणार नाही!”

कवी कलश :
“लोभ नहीं जिंदगी का कभी था,
पर होती जो हाथ खड्ग दुधारी…
साथ तुम्हारे महारण में लड़ता,
नित ही बन वीर जुझारी…!”

अर्थ (नाट्यमय आणि प्रवाही)

“फाशीच्या फासावरही आम्ही आनंदाने चाललो आहोत,
तळपायातल्या जखमा अजूनही ठणकत आहेत…

गड्यांनो, आम्हांला कधीच जीवनाचा लोभ नव्हता;
पण अजून एकदा हातात तलवार घ्यायला मिळाली असती,
तर रणांगणात पुन्हा जोमाने झुंजलो असतो —
तुमच्या सोबत, वीरांसारखे!”

अंतिम प्रभावी शेवट (स्टेजसाठी)

कवी कलश : (उंच स्वरात, जाज्वल्य)
“मरण आमचं भाग्य आहे,
आणि स्वराज्यासाठी मरण — हेच आमचं अमरत्व!”

संभाजी राजे : (ताठ उभे, तेजस्वी)
“हा देह जाईल…
पण स्वराज्याचा जाज्वल्य ज्वालामुखी कधीच विझणार नाही!”

शेवटची स्टेज डायरेक्शन

- (पार्श्वभूमीला मंद “हर हर महादेव” ध्वनी)
- (प्रकाश हळूहळू कमी होत जाऊन फक्त राजांवर स्पॉट)
- (ढोल-ताशांचा मंद नाद)

पडदा हळूहळू खाली येतो…

[बंदिखाण्यात बंदोबस्ताचे वरपांगी नाटक करत औरंगजेब त्या दोघांच्या जवळ येतो. संभाजी राजांकडे रोषाने पाहत तिरस्काराने बोलतो.]

औरंगजेब :
"संभा… तीस वर्ष झाली असतील त्या घटनेला. माझ्या सख्या भावाची, शहजादा दाराची, अशीच मरतुकड्या हत्तीवरून धिंड काढली होती मी दिल्लीच्या रस्त्यांवर. तेव्हा त्या बेवकूफ माणसाच्या बेइज्जतीवर मी मोठ्या आनंदाने हसलो होतो."

कवी कलश :
"पातशहा… तूच बेवकूफ आहेस. दारा एक भला, नेक इंसान होता. हिंदू-मुस्लिम दोघांचाही प्रिय शहजादा होता."

औरंगजेब :
"पागल शायर, अपनी जुबान संभाल! नहीं तो तुम्हारी ही जुबान मी मुळापासून उपटून टाकीन."
[तो कडाडतो.]

संभाजी राजे :
[हसत]
"केवळ घातपात! बेवकूफ पातशहा, अशा कपटातून आणि रडीच्या डावातून मिळवलेली विजयाची तू फत्तेह मानतोस, तर तू खऱ्या अर्थाने गद्दारांचाच शहेनशहा आहेस! हिंदुस्तानचा नव्हे."

औरंगजेब :
“ये रग… ये मस्ती?”
[रागाने]

संभाजी राजे :
“का नाही? तुला हिंमत असेल तर या बेड्या तोडून दाखव. मग आण तुझा कोणताही सरदार, शहजादा किंवा पोता. मैदानात समोरासमोर जंग होऊ दे. मग पाहा, शिवपुत्र संभाजीच्या हातातील तलवार तुझ्या प्रत्येक सवालाचं उत्तर कसं देते!”

[क्षणभर शांतता… संभाजी ठामपणे पुढे बोलतात.]

औरंगजेब :
“संभा, त्या धिंडीच्या वेळी काय कमी पाहिलंस? तेव्हा कोण आलं तुझ्या मदतीला? बेवकूफ राजा! आपली ही प्यारी जिंदगी वाचव. आमचं ऐक.”

[संभाजी डोळ्यांत रोष आणि अविचल निर्धार ठेवून नजर फिरवतात.]

संभाजी राजे :
“त्या निंदनीय धिंडीने तुम्ही आमचा अपमान केला, हे संपूर्ण जगाला ठाऊक आहे.”

[संभाजी काहीही करून शरण येत नाहीत. औरंगजेब आपल्या लाघवी पण कपटी भाषेत त्यांना वश करण्याचा प्रयत्न करतो…]

औरंगजेब :
“संभा… तुझ्या बापाचा, त्या शिवाचा मला नेहमीच हेवा वाटतो.”

[संभाजी बिथरलेल्या नजरेने औरंगजेबाकडे पाहतो.]
“एका जंगली चुव्याने, मामुली जमीनदाराने मराठ्यांची सल्तनत उभी करावी, हीच त्याची खरी बहादुरी!”

संभाजी राजे :
“पातशहा… माझ्या पित्याची दौलत म्हणजे कोण्या घमेंडखोर सुलतानाची राजगादी नव्हती. ते गोरगरीबांचं स्वराज्याचं स्वप्न होतं!”

औरंगजेब :
[भारावलेल्या स्वरात]
“कितना खुशकिस्मत तो शिवा… तुझ्यासारखा होनहार पुत्र त्याला लाभला. आम्हाला तुझा अभिमान वाटतो.
माणूस अनुभवाने शहाणा होतो, ठेच लागल्यावर सावध होतो. पण तू… आठ वर्षे माझ्या पाच लाखांच्या फौजेला, हजारो सरदारांना गरगर फिरवलंस. माझ्या आयुष्यातला हा सर्वात मोठा अनुभव आहे, हे मी खुल्या दिलाने कबूल करतो शहजादे. ही केवळ तारीफ नाही, ही हकीकत आहे.

आपल्या बापानंतर मराठ्यांच्या गादीसाठी तू जसा आमच्याशी आठ वर्ष कडवा मुकाबला केलास, किल्ले लढवत ठेवलेस, दर्याचं पाणी पेटवलंस… तशी जरी थोडीशीही हिम्मत माझ्या चार शहजाद्यांपैकी कुणात असती तर…?”

संभाजी राजे :
[दीर्घ श्वास घेत, औरंगजेबाकडे थेट नजर रोखत]
“औरंगशहा… अशी वरवरची तारीफ करण्याऐवजी तुला जे काही हवं आहे, ते साफ दिलाने सांगून टाक.”

औरंगजेब :
“तुझा मुख्य खजिना कुठे आहे?”

संभाजी राजे :
“गडांवर… किल्ल्यांवर!”
[करारी आवाजात]

औरंगजेब :
“आमच्या फौजेतील कोण कोण शैतान तुला सामील आहेत?”

संभाजी राजे :
“माहीत नाही.”
[करारी आवाजात]

औरंगजेब :
[कंटाळून, मोठ्या आवाजात]
“घमंडी संभा, अजून शुद्धीवर ये. त्या बेवकूफ शायराच्या नादी लागून तू भटकू नकोस. तुला कल्पनाही नाही. आतापर्यंत आमच्या चाळीस हजार फौजा तुझ्या मुलखात घुसल्या असतील. त्यांनी रायगडला वेढा घातलाय.”

संभाजी राजे :
“बेवकूफ पातशहा, आमचा रायगड काही ठिसूळ मातीचा किल्ला नाही.”

औरंगजेब :
“पोलादाचा असला तरी आम्ही तो वितळवून टाकण्याचा हुकूम दिलाय.”

संभाजी राजे :
“तो पत्थराचा किल्ला आहे… आणि पत्थर कधीच दुभंगत नाही.”

औरंगजेब :
“काफिरबच्चा… आमच्या सर्व फौजा तुझ्या मुलखात धुडगूस घालत आहेत. तुझ्या राज्यातील अनेक वतनदार आमच्याकडे आले आहेत.”
“संभा, तुझ्याकडून आम्हाला फक्त दोन गोष्टी हव्यात—
एक म्हणजे फितुरांची यादी,
आणि दुसरी म्हणजे सह्याद्रीतील सर्व बलाढ्य किल्ल्यांच्या चाव्या,
ताब्यासह!”

संभाजी राजे :
[पातशहाच्या बोलण्यावर राजांना हसू फुटते, ते खिल्ली उडवतात.]
“मूर्ख पातशहा! सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरचे आमचे हे बळकट किल्ले म्हणजे आमची शोभा, आमचं सामर्थ्य आणि आमचं गंडस्थळ आहे!
या शिवपुत्र संभाजीकडे अशी मागणी करण्याची बेवकूफी करतोस?

उद्या तू ईदच्या चांदकडे जोगवा मागशील, किंवा आकाशातील चांदण्या खुडून दे म्हणशील!
असं काही शक्य आहे का?”

[कोपऱ्यात उभा कवी कलश पातशहाच्या या मूर्ख मागणीवर हसतो. त्याची कुचेष्टा आणि उपहास पाहून औरंगजेब अधिकच संतापतो.]

औरंगजेब :
[कवी कलशकडे रागाने पाहत]
“चूप… पागल शायर!”

“संभा, तू एक गोष्ट विसरू नकोस.
आमच्याकडे दया, माया, प्रेम अशा खोट्या गोष्टींना कधीही स्थान नाही.
आम्ही उघड्या सत्याचे उपासक आहोत.”

“तुझ्याशी आम्ही वचन देतो—
तुझ्या सर्व प्रमुख किल्ल्यांचा ताबा आमच्या अधिकाऱ्यांच्या हाती दे, आणि मग तू आणि तुझा हा मित्र कोणत्याही मुलखात निघून जा.”

कवी कलश :
[खदखदून हसत]
“वा… बेवकूफ पातशहा!”

औरंगजेब :
“ये मजाक नहीं है, बेवकूफ शायर! हवं तर कुराणे शरीफवर हात ठेवून आम्ही तुम्हाला वचन देतो.”

संभाजी राजे :
[पातशहाकडे पाहत छद्मीपणे हसतात.]
“आमच्या गड-दुर्गांच्या चाव्या मिळवण्यासाठी तू फारच बेताल झालास, पातशहा!
न लढता सरळ किल्ल्यांचा ताबा तुला द्यायचा म्हणतोस?”

औरंगजेब :
“बिलकुल.”

संभाजी राजे :
“अरे! आमचा एक रामसेज किल्ला घ्यायलाच तुला साडे सहा वर्षे लागली. मग आमचे साडेतीनशे किल्ले मिळवण्यासाठी तुला किती जन्म घ्यावे लागतील, याचा विचार कर!”

“आम्ही मराठे किल्ल्याच्या प्रत्येक दगडाला आमच्या रक्ताचा शेंदूर लावतो, आणि त्याचं रक्षण करत करत प्राण अर्पण करतो.”

“तुझ्यासारख्या ऐतखाऊ अवलादींना किल्ल्यांच्या चाव्या मिळतातच; पण स्वाभिमानाने जगणाऱ्या, आपल्या बहिणींचा सन्मान राखणाऱ्या आणि दौलत वाचवण्यासाठी प्राण देणाऱ्या मराठ्यांची अवलाद या महाराष्ट्रात आहे… इथे नाही.”

[औरंगजेब रागाने लालबुंद होतो. तो इकडे-तिकडे पाहतो, दोन्ही हात मुठीत आवळतो. तीव्र संतापाने मान हलवतो.]

पडदा पडतो…

[पातशहाला झोप लागत नाही. तो बिछान्यावर अस्वस्थ बसलेला असतो. रात्री तो शिपायाला हुकूम देतो.]

औरंगजेब :
“रुहुल्लाखान को बुलाओ!”

रुहुल्लाखान :
[येऊन मुजरा करत]
“हुकूम, मेरे आका.”

औरंगजेब :
“उस नादान शायर को ले आओ.”

[रुहुल्लाखान मुजरा करून निघून जातो. काही वेळाने तो कवी कलशांना घेऊन येतो. कवींच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि उपहास आहे. समोर येताच ते मोठ्याने हसू लागतात. औरंगजेब क्षणभर चकित होऊन पाहतो.]

कवी कलश :
“लो… एक बेवकूफ पातशहा, एका नादान शायराशी सौदा करण्यासाठी स्वतःच पुढे आला!”

औरंगजेब :
[हसत, संयम ठेवत]
“बोलो, कविराज… तुम्हाला काय हवं आहे?”

कवी कलश :
[मोकळेपणाने हसत]
“शायर आणि कवींच्या मेंदूत मस्तीचा बारूद भरलेला असतो, शहेनशहा! आमच्या दुनियेत सिंहासनाला कवडीइतकंही स्थान नसतं. आमचा कैफ, आमची बेहोषी आणि आमची बेखुदी—हेच आमचं सिंहासन आहे.”

औरंगजेब :
[उपहासाने हसत]
“पागलखान्यातून जे लोक पळून जातात, त्यांनाच दुनिया शायर म्हणून ओळखते! तूही एक नादान शायर आहेस, बस.”

कवी कलश :
“बिलकुल.”

औरंगजेब :
“म्हणूनच तुला ना जागीरची लालसा असेल, ना हिरेजवाहरातांची.”

कवी कलश :
“जी हाँ… अंगावर लाज झाकण्याइतका लिबास आणि शंभूराजांसारखा दोस्त नव्हे, तर फरिश्तासारखा सहवास लाभला—माझ्यासारख्याला अजून काय हवं?”

औरंगजेब :
[अत्यंत संतापाने]
“अरे! तू तर कनोजचा ब्राह्मण… स्वतःचं पोट भरण्यासाठी दारोदार भटकणारा!

देवधर्माचे ढोंग करणारा! गंगाकाठी तीर्थासाठी आलेल्या यात्रेकरूंना दौलतीच्या लोभाने लुटणारा!”

कवी कलश :
“तुला जे म्हणायचं आहे ते म्हण.”

औरंगजेब :
“तू एक भुका-प्यासा ब्राह्मण आहेस!”

औरंगजेब :
[हसत, हळू आवाजात लाडीगोडी लावत]
“तुझ्याकडे आमचं एक छोटंसं काम आहे.
तू संभ्याचा मुख्य दिवाण, वजीर-ए-आझम आहेस—साऱ्या मराठ्यांना हे माहीत आहे.
तो संभा आता आमच्या ताब्यात आहे. ही खबर सगळीकडे पसरली आहे.”

“आता तुला फक्त इतकंच करायचं आहे—”

कवी कलश :
“काय?”

औरंगजेब :
“तुझ्या स्वतःच्या सही-शिक्क्याने मराठ्यांच्या प्रत्येक किल्लेदाराला एक हुकूमनामा पाठवायचा. त्यात असं लिहायचं की—संभाजीने आपला जीव वाचवण्यासाठी औरंगजेबाशी सौदा केला आहे. आणि त्या आधारे सर्व किल्ले मोगलांच्या ताब्यात द्यावेत. हा खोटा हुकूम तुला संभाजीनेच दिला आहे, असं सांगायचं.”

कवी कलश :

[हसत]

“खोटे हुकूम? शंभूराजांच्या नावाने खोटे हुकूम?”

औरंगजेब :

“हाँ! क्यूँ नहीं?

या छोट्याशा शाही सेवेबद्दल तुला आम्ही मालामाल करू.

बोल… कोणती जागीर हवी तुला?

बरेली, सासाराम, कानपूर की आग्रा?”

कवी कलश :

[पातशहाच्या नजरेला थेट भिडत]

“पातशहा सलामत… आपण खूप कमीने आहात, हे तुमच्या शहजादा अकबरापासून अनेकांनी आम्हाला सांगितलं होतं.

पण आज कळलं की तुम्ही तर या जगातल्या सर्व कमीने, मक्कार आणि कपटी लोकांचे सरताज आहात!”

औरंगजेब :

[लालबुंद होऊन जोरात कडाडतो]

“जुबान संभाल के बात कर, बेवकूफ!”

कवी कलश :

“अरे! स्वार्थासाठी सख्ख्या भावांच्या पोटात आणि पाठीत खंजीर खुपसणारा बदमाश तू!

आपल्या पंडित दारासारख्या हुशार भावाचं तू मुंडकं कापलंस—इतका हैवान आहेस तू!”

“स्वतःच्या जन्मदात्याचं पाणी तोडणारा तू एक हरामखोर! यारी आणि दोस्तीचा खरा अर्थ काय असतो, हे तुझ्यासारख्या निष्ठुर हृदयाला कधीच कळणार नाही!”

औरंगजेब :
“ठहरो, पागल! खामख्वाह अपनी जिंदगी गमवून बसशील—”

कवी कलश :
“करून करून माझं काय वाकड करशील रे, बुड्ढ्या कोल्ह्या?”

औरंगजेब :
“पागल ब्राह्मण! तुला फाशीच्या फांद्यावर लटकवीन मी.”

कवी कलश :
“जुलूस आम्ही केव्हाच संपवलाय… आणि संपला तर बेहत्तर!”
[गर्वाने]

औरंगजेब :
“कोण आहे तिकडे!”

[त्याच्या संतापाचा कडेलोट होतो. बाहेर उभे असलेले खोजे आणि सैनिक आत येतात. कवी कलशांना धरून मारहाण सुरू होते. काही क्षणातच त्यांची अवस्था गंभीर होते. तरीही ते थरथरत्या पण ठाम आवाजात गातात.]

कवी कलश (गात):
“पाप कर्म करके सदा कहता बिस्मिल्लाह,

ढोंग किया, टोपी सिया—मिले नहीं अल्लाह,
निज दिमाग को टॉका लो, पागल है पातशाहा!”

(अर्थ: पाप करूनही ‘बिस्मिल्लाह’ म्हणतोस; ढोंग करून, टोपी शिवूनही अल्ला सापडत नाही. स्वतःच्या मेंदूला शहाणपण आण—पातशाहाच वेडा झाला आहे!)

[या ओळी ऐकताच औरंगजेब भडकतो.]

औरंगजेब :
“क्या बक रहे हो? पहले इस बेबाक शायर की जुबान बंद करो…!”

[सैनिक कवी कलशांना वेढतात. त्यांना आवळून धरले जाते. प्रकाश मंद होतो—फक्त सावल्या दिसतात. त्यांच्या वेदनेचा आवाज आणि तडफड प्रेक्षकांपर्यंत पोहोचते.]

पडदा.

[तुळापुरची छावणी. संभाजी राजे आणि कवी कलशांवर अत्याचार होऊनही काहीच साध्य झालेलं नाही. औरंगजेब अस्वस्थ, चिडलेला. त्याच्या चेहऱ्यावर असुरक्षिततेची छटा.]

औरंगजेब :
“कोण आहे तिकडे?”

रुहुल्लाखान :
[मुजरा करून]
“जी, हुजूर.”

औरंगजेब :
“जा… त्या पागल कवीवर अजून कठोर कारवाई करा.”

[रुहुल्लाखान निघून जातो. काही क्षणांनी, पुढील दृश्यात कवी कलशांची अवस्था अत्यंत गंभीर दाखवली जाते—प्रेक्षकांना त्यांच्या यातनेची जाणीव होते, पण दृश्य सूचक ठेवले जाते.]

[संभाजी राजांना पुढे आणलं जातं. ते ताठ उभे—डोळ्यांत संताप, पण चेहऱ्यावर भीतीचा लवलेश नाही.]

औरंगजेब :
[विषारी उपहासाने]
“संभा… तुझ्या दोस्ताची ही अवस्था पाहून तरी तू शहाणा होशील असं वाटलं होतं. पण खैर…”

“आता तुला नवी ‘दृष्टी’ देण्याचीच गरज आहे.”

[बाजूला तापत्या सळया ठेवलेल्या आहेत. वातावरणात तणाव दाटतो.]

औरंगजेब :
“आइए… मियाँखान, सामने आइए.”

[मियाँखान घाबरत पुढे येतो. हात जोडून वाकतो.]

मियाँखान :
“वजीर-ए-आझम…”

औरंगजेब :
“मियाँखान, संभाला नवी ‘दृष्टी’ देण्याचं हे काम—
आम्हाला एका इमानी, वफादार माणसाकडून करून घ्यायचं आहे.

आणि तुझ्यासारखा वफादार इसम आमच्या लष्करात दुसरा नाही.”

[संभाजी राजे ताठ उभे. त्यांच्या चेहऱ्यावर तिरस्कार, पण मनात अढळ धैर्य. प्रकाश फक्त त्यांच्या चेहऱ्यावर केंद्रित.]

[क्षणभर स्तब्धता—प्रेक्षक श्वास रोखून.]

मियाँखान :
[घाबरून, गयावया करत]
“हुजूर… ये पाप मुझसे मत करवाइये… रहम कीजिए!”

[तो पातशहाच्या पायाशी विनवणी करतो. औरंगजेब संतापाने गर्जतो.]

औरंगजेब :
“मियाँखान नकार देतोय? तर आधी त्यालाच ‘नवी दृष्टी’ द्या!”

[क्षणभर स्तब्धता. मियाँखान थरथरत्या हातांनी पुढे जातो. त्याच्या चेहऱ्यावर भीती आणि विवंचना. संभाजी राजे ताठ उभे—डोळ्यांत तेज, चेहऱ्यावर निर्धार.]

[मियाँखान पुढे सरसावतो... पण अचानक थांबतो. एका क्षणात तो निर्णय घेतो—आणि स्वतःलाच इजा करून कोसळतो.]

[छावणीत खळबळ उडते. सैनिक धावून येतात. गोंधळ, आरडाओरडा. काही क्षणांत मियाँखान निश्चल पडलेला.]

[संभाजी राजे शांत—डोळ्यांत करारी तेज.]

औरंगजेब :
[कडाडत]
"काय पाहताय? संभाला 'नवी दृष्टी' द्या!"

[सैनिक पुढे येतात. प्रकाश मंद होतो. फक्त सावल्या—तणावपूर्ण शांतता. क्षणभर काळोख.]

[प्रकाश पुन्हा उजळतो—संभाजी राजे ताठ उभेच. चेहऱ्यावर वेदना नाही, फक्त अढळ धैर्य.]

[त्यांच्या तोंडून एकही आक्रोश नाही. हीच गोष्ट औरंगजेबाला अधिक चीड आणते.]

दृश्य स्थिर. पडदा हळूहळू खाली येतो.

संभाजी राजे :
“बेवकूफ पातशहा… मृत्यू आला तरी बेहत्तर!
पण हा शिवपुत्र संभाजी कदापिही फसणार नाही.
तुझ्या त्या बुड्ढ्या देहात अजून खुमखुमी असेल, तर अल्लाहच्या घरी जाण्याआधी या शिवपुत्राचे किल्ले जिंकून दाखव!”

[संभाजी आव्हान देतात.]

औरंगजेब :
“ते तर आम्ही जिंकणारच आहोत… पण सांग—कोण कोण आमचे गद्दार तुला सामील होते?”

संभाजी राजे :
“तुला हव्या असलेल्या त्या सवालाचा जवाब आम्ही कधीच देऊ शकणार नाही.”

औरंगजेब :
“क्यूँ?”

संभाजी राजे :
“आम्ही आमच्या दुश्मनावर समोरून समशेर चालवतो…
आणि आमच्या दोस्तांची पाठ मात्र सुरक्षित ठेवतो—त्यांना शाबासकी देण्यासाठी!
गद्दारांचे छुपे खंजीर चालवण्यासाठी नव्हे!”

[संभाजींच्या या उत्तराने औरंगजेबाचा चेहरा काळवंडतो. त्याच्या हातून काहीच साध्य झालं नाही, याची खंत त्याला पोखरते. तो झपझप पावले टाकत निघून जातो.]

{पडद्यामागून निवेदन}

[काळी रात्र… सर्वत्र अंधार. रातकिड्यांचा किर्रर्र आवाज.
संभाजी राजे शांत बसलेले. विचारांची चक्रे वेगाने फिरत आहेत.]

“हे नियतीचं ओझं माझ्यावरच का कोसळलं?
मी अपराधी तर नाही ना?
रक्ताची नातीच आज वैर का धरत आहेत?
आबासाहेब… तुम्हाला काय वाटेल?
मला क्षमा कराल ना…?”

[नेत्रहीन डोळ्यांतून अश्रू वाहू लागतात. शरीर वेदनेने जर्जर, पण मनात एक विलक्षण शांतता.]

[अचानक—एक अदृश्य, मायेचा स्पर्श. भव्य भाळावरून हात फिरतो.
गालावर कोमल स्पर्श.]

[तो स्पर्श—ओळखीचा… जिव्हाळ्याचा.]

संभाजी राजे :
[आनंद आणि वेदनेच्या हुंदक्यात]
“आबासाहेब…! आबासाहेब…!
अखेर आलात का आपल्या शंभूबाळाला भेटायला?”

[ती भासमूर्ती त्यांना कवेत घेते. पाठीवरून हात फिरवते. एक करुण, पण प्रेमळ आवाज उमटतो…]

शिवाजी राजे :
[शांत, करुण स्वरात]
“शंभू… लेकरा… किती दुष्ट ही दैवगती!”

संभाजी राजे :
“आबासाहेब… आपण?”

शिवाजी राजे :
“होय, आम्हीच… तुझा आबासाहेब!”

संभाजी राजे :
[आवाज दाटून]
“आबासाहेब… अखेर आपण भेटलात! आम्ही धन्य झालो…
या शंभूकडून काही चूक-गुन्हे घडले असतील, तर क्षमा करा… मला माफ करा, आबासाहेब!”

शिवाजी राजे :
“लेकरा, असं बोलू तरी नकोस!
घोड्याच्या पाठीवर सिंहासन लादून, देश-धर्मासाठी आठ-आठ वर्ष बलाढ्य शत्रूशी झुंज देणारा योद्धा क्वचितच जन्माला येतो.

शंभू, अवघ्या बत्तीसाव्या वर्षी तू औरंगजेबाशी दिलेली झुंज—अद्वितीय, अद्भुत आहे!”

संभाजी राजे :
“आबासाहेब… अंगात जितकं बळ होतं, जितकी शक्ती होती—सारी पणाला लावली आम्ही…”

शिवाजी राजे :
“शंभूबाळ, तुझ्या पराक्रमाला तोड नाही.
हा महाराष्ट्र, ही माती—तुला आणि तुझ्यासोबत रक्त सांडणाऱ्या सहस्र वीरांना कधीच विसरणार नाही.”

संभाजी राजे :
“आबासाहेब… आम्ही तर बदनाम ठरलो…”

शिवाजी राजे :
“नको! असं कधीही म्हणू नकोस!
गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही वरून सगळं पाहत होतो…”

[क्षणभर थांबतात.]

“एक गोष्ट सांगू का, शंभू?”

संभाजी राजे :
“आबासाहेब…?”

शिवाजी राजे :
“या जन्म-मृत्यूच्या दैवी बंधनांनी आमचे हात जखडले आहेत, म्हणूनच आम्ही तुझ्याजवळ येऊ शकलो नाही.
नाहीतर स्वर्गाचे दरवाजे तोडून, हातात खड्ग घेऊन आम्ही केव्हाच तुझ्या

मदतीला धावलो असतो—
आणि त्या औरंगजेबावर कर्दनकाळ बनून कोसळलो असतो!"

संभाजी राजे :
"आबासाहेब… आप्तस्वकीयांचे घात, दही दिशांनी आलेल्या संकटांनी आम्ही भांबावलो होतो…
काळाने हातातून शस्त्रही हिरावून घेतलं… दृष्टीही नेली…"

शिवाजी राजे :
"शंभूराजा!
अंधाराच्या काटेरी वाटा तुडवतानाही तू निराशेचा एकही ओरखडा मनावर येऊ दिला नाहीस.

आजही मनात अपराधाची छाया येऊ देऊ नकोस.
एक दिवस येईल—तुझ्या कार्यापुढे सर्वांना मस्तक झुकवावंच लागेल!"

"तू बुद्धी आणि पराक्रमाच्या जोरावर पाच लाख फौजेचा महापूर आठ वर्ष अडवून धरलास!
जर तू ढासळला असतास, तर या भूमीवर संकटांचा महापूर ओसंडून वाहिला असता."

[संभाजी राजे शिवरायांच्या खांद्यावर मान टेकवतात.]

संभाजी राजे :
"आबासाहेब…"

शिवाजी राजे :
“होय, बाळा…”

“शंभू, माझ्या बहादूर पुत्रा!
औरंगजेब—तो कपटी, क्रूर, महादैत्य!
ज्याच्या नावानं दक्षिणेतील सत्ताधीश थरथर कापत होते…

अशा शत्रूशी तू कडवी, दीर्घ झुंज दिलीस—
पाठीशी सह्याद्री उभा करून!”

“जेव्हा तलवारी गंजल्या होत्या, बुद्धी कुंठित झाली होती, आणि रयत संकटांनी कोसळली होती—
तेव्हा उरलेल्या माणसांना एकत्र करून तू संकटातून वाट काढलीस!”

“इतक्या प्रचंड शत्रूशी, इतक्या कमी साधनांनी वर्षानुवर्षे झुंज देणारा योद्धा—
इतिहासात शोधावा लागेल!”

[थोडा विराम.]

“खरं सांगू शंभू…
तुझा विचार करूनच संत तुकारामांनी कदाचित या ओळी लिहिल्या असतील—”

शिवाजी राजे (ठाम स्वरात):
“पुत्र व्हावा असा गुंडा,
त्याचा तिहीं लोकी झेंडा!”

संभाजी राजे :
“बस… बस, आबासाहेब!
मृत्यूच्या मंदिराकडे प्रवास सुरू होण्याआधी आपण भेटलात…
आपल्या या शब्दांनी आम्हाला इतकं तृप्त केलं आहे की,
आता माझ्यावर शहस्त्र मरणांचा वर्षाव झाला तरी बेहत्तर!”

शिवाजी राजे :
“शंभू… आज या शिवाजीचं काळीज दोन गोष्टींसाठी तिळतिळ तुटतं आहे.
एक—आप्तस्वकीयांनीच दगाबाजी करून तुझ्यासारख्या पराक्रमी वाघाचे पाय तोडले…
आणि दुसरं—या दैवगतीच्या दुष्ट खेळाबद्दल!”

संभाजी राजे :
“आबासाहेब…!”

शिवाजी राजे :
“होय, शंभूराया!
आमच्या आयुष्यात कसोटीचे क्षण कमी होते का?

कुटील अफजलखानाच्या भेटीसाठी आम्ही निघालो तेव्हा मृत्यू
आमच्यासोबत चालत होता—
तरीही सुदैवाने वाचलो.

आग्र्याच्या बंदिवासात हजारो शत्रूंच्या वेढ्यात होतो—
तिथूनही सुटलो.

जालन्याहून परतताना संगमनेरजवळ रणमस्तखानाच्या विळख्यातून—
तिथेही थोडक्यात बचावलो!”

[क्षणभर थांबतात. आवाज दाटतो.]

“थोडक्यात सांगायचं तर, जे दुर्दैव तुझ्यावर संगमेश्वरात ओढवलं…
तेच आमच्यावर संगमनेरात ओढवणार होतं!”

[शिवाजी राजे अडखळतात. त्यांना हुंदका आवरता येत नाही. ते संभाजींच्या जखमी मस्तकाला छातीशी घट्ट कवटाळतात.]

शिवाजी राजे :
“शंभू… आमच्या आयुष्यात दैवाने भाग्याच्या पेटाऱ्या उघडल्या…
यशाच्या संधी आमच्या पायाशी ओतल्या…”

[आवाज अधिक करुण होतो.]

“पण आज मनाला एकच खंत बोचते—
त्या भाग्यातील चार मुठी जरी दैवाने माझ्या शंभूबाळासाठी राखून ठेवल्या असत्या तर…!”

[वातावरण स्तब्ध. शांतता. फक्त भावनांचा आवेग.]

संभाजी राजे :
“आबासाहेब…!”

शिवाजी राजे :
“पोरा… कुठे गेले ते तुझे तेजस्वी, जाज्वल्य डोळे?”

संभाजी राजे :
“आबासाहेब… वतनाच्या भुकेने आंधळे झालेल्या आपल्या लोकांनीच शेवटी दगाफटका केला.
मृत्यूपूर्वी नेत्र गेले—एक अर्थी बरंच झालं!
स्वार्थासाठी चटावलेला हा महाराष्ट्र पाहण्यापेक्षा अंधार बरा!”

शिवाजी राजे :
“खरं आहे पोरा… रयतेनं तुला साथ दिली, गोरगरीब जनतेनं प्राणपणानं लढा दिला.
पण वतनदारांनी, स्वार्थाने बरबटलेल्या जाणत्यांनीच तुझा घात केला.

सर्वांनी एकदिलानं उभं राहिलं असतं, तर पातशहा केव्हाच संपला असता!
पण स्वार्थासाठी राजा मारावा, राज्य बुडावं—अशी त्यांची वृत्ती…
याचाच हा परिणाम!”

संभाजी राजे :
“आबासाहेब… आपल्या शब्दांनी आमची सारी कोडी सुटली.”

शिवाजी राजे :
“हे महाराष्ट्रा!
जीवन कसं जगावं, हे या शिवाजीन शिकवलं असेल—
पण देश, धर्म आणि मातीसाठी मरावं कसं, हे आमच्या शंभूराजांकडून शिका!

आमच्या गौरवात गुंतून, शंभूच्या बलिदानाकडे दुर्लक्ष करू नकोस.
ज्या दिवशी त्याच्या पराक्रमाची खरी गाथा जगासमोर येईल,

तेव्हा लोक वंशाचा शोध घेण्यासाठी वाळवंटात धावणार नाहीत—
उलट या सह्याद्रीशी नातं जोडण्यासाठी धाव घेतील!”

संभाजी राजे :
“आबासाहेब… आपल्या शब्दांनी आम्ही पावन झालो.
आता मृत्यूच्या उंबरठ्यावर कोणतंच शल्य उरलेलं नाही.

उलट—मृत्यूला मिठी मारण्यासाठी आम्ही तयार आहोत!
जर आमच्या मृत्यूने हा झोपलेला महाराष्ट्र जागा होणार असेल,
तर हा मृत्यूही आम्हाला भाग्यवान वाटेल!”

[पहाटेचा अंधुक प्रकाश. संभाजी राजे जागे होतात. शिवाजी राजांची भासमूर्ती हळूहळू अदृश्य होते.]

संभाजी राजे :
“कविराज…?”

[उत्तर नाही. फक्त दूरवर हालचालींचा क्षीण आवाज.]

संभाजी राजे :
“मृत्यू… हा एक हट्टी पाहुणा आहे.
हाकलून दिला तरी दारातच थांबतो.

आता तो कधीही येऊ दे—
विजेप्रमाणे कोसळू दे!”

“कविराज… आता या देहाला मृत्यूची भीती उरलेली नाही.
एकच इच्छा होती—त्या औरंग्याचा अंत करून मग शांत व्हावं…
पण तेही राहिलं…”

[क्षणभर विराम.]

“ज्या हातांनी रणांगण गाजवलं…
ज्या तलवारीनं शत्रूला रोखून धरलं…
त्याच संभाजीच्या पाठीवर आप्तांनी वार केला…
याचंच दु:ख आहे!”

“मृत्यूला आम्ही कधीच घाबरलो नाही—
तोच आमच्यापासून दूर पळायचा…
पण आज… तो चोरासारखा दबकत येतोय…
याचीच खंत आहे!”

[दूरवर कवी कलशांचा अस्पष्ट, आकाशवाणीप्रमाणे आवाज.]

कवी कलश (आकाशवाणी):
“राजन… मी भाग्यवान आहे!
मी आधीच त्या स्वर्गमंदिराकडे निघालो…
तुमच्यासाठी फुलांची वाट अंथरायला…
तुमच्या थकलेल्या पावलांना विश्रांती देण्यासाठी…”

[आवाज विरतो.]

[अचानक सैनिकांचा गडगडाट. अंधारातून हालचाल.
औरंगजेब प्रवेश करतो. संभाजी राजे सावध होतात—ताठ उभे, छाती पुढे, मान उंच.]

औरंगजेब :
"संभा! जहन्नमी… तू तुझ्या बापापेक्षाही आम्हाला जास्त त्रास दिलास.
आमची एकही गुजारिश मान्य केली नाहीस!

तुझ्या तोंडून शरणागतीचे शब्द ऐकावे, म्हणून आम्ही तुझी जुबान शाबूत ठेवली होती—
पण तिचाही उपयोग तू केला नाहीस!

आमच्याशी गद्दारी करणाऱ्यांची नावं सांगत नाहीस…
डोळे हिरावले, तरी तुझ्या पायात भीती नाही!

आणि तरीही—रायगडावर बसलेली तुझी राणीही तुझ्यासाठी भीक मागायला आली नाही!
किती हा अहंकार… किती ही बेगुमानी!"

"संभा… आता तुला जिवंत ठेवण्याचं कारण तरी काय उरलं आहे?"

[संभाजी राजे ताठ उभे—छाती पुढे, मान उंच.]

संभाजी राजे :
"लक्षात ठेव, पातशहा—
माझ्या प्रत्येक रक्ताच्या थेंबातून असंख्य संभाजी जन्माला येतील!

माझ्या दोन हातांऐवजी लाखो हात सह्याद्रीत उभे राहतील—
तुझ्या जुलमी सत्तेचा अंत करण्यासाठी!"

"आम्ही सह्याद्रीचे छावे—
मरणाची भीक मागत नाही!

गादीसाठी स्वतःच्या रक्ताचा सौदा करणारी औलाद नाही आम्ही!
जन्मदात्याला कैद करून जुलूम करणे—हे मराठ्यांच्या रक्तात नाही!"

"तुझी ही मोगली सत्ता—
मराठ्यांच्या एका ठोकराने उडून जाईल!

तुझ्यासारख्या लांडग्याला महाराष्ट्राचे वाघ पळताभुई थोडी करतील!
वाघाच्या जबड्यात हात घालून दात मोजण्याची औकात आहे आमची!"

औरंगजेब :
[संतापाने गर्जतो]
"खामोश!

याचे हात छाटून टाका… पाय तोडा…
ही जीभ—खूप बोलते!

याच्या शब्दांनी आम्हाला जाळलं आहे…
घेऊन जा याला आमच्या नजरेसमोरून!"

[सैनिक संभाजी राजांना घेऊन जातात. प्रकाश मंद होतो.
औरंगजेब एकटाच—हताश, अस्वस्थ. डोकं हातात.]

{पडद्यामागून निवेदन}

[पांढऱ्या पडद्यामागे सावल्यांद्वारे प्रसंग सूचक दाखवले जातात.]

“फितुरीच्या फटक्याने मराठ्यांचा मुकुट शत्रूच्या पायाशी गेला…
नऊ वर्षे बारा आघाड्यांवर झुंज देणारा सर्जा—संभाजी—
शेवटी शत्रूच्या तावडीत सापडला…”

“अत्याचार झाले… अमानुष वेदना…
पण तो डगमगला नाही… वाकला नाही…”

“हे सगळं कुणासाठी?
हिंदवी स्वराज्यासाठी…
मातृभूमीसाठी…
छत्रपतींच्या अस्मितेसाठी…
धर्मासाठी… राष्ट्रासाठी…”

[क्षणभर शांतता]

“आणि मग…
फाल्गुन वद्य अमावस्या—११ मार्च १६८९—
तो काळा दिवस उगवला…”

“महाराष्ट्राचा राजा—
मातीत विलीन झाला…
पण इतिहासात अमर झाला…”

[पांढऱ्या पडद्यावर प्रकाश—संभाजींची ताठ उभी सावली. हळूहळू अंधार.]

पडदा...

औरंगजेब :
“क्या बोला वो संभ्या?”

शिपाई :
“काही नाही, हुजूर…”

औरंगजेब :
“काय येईल का तो… आमच्याकडे माफी मागायला?”

शिपाई :
“नाही, हुजूर!”

औरंगजेब :
“मग काय म्हणतो तो?”

शिपाई :
“हुजूर… संभाजी ना रडला…
आणि तो तुमच्याकडे माफी मागायला येणार नाही!”

औरंगजेब :
“जा… त्याला आदराने निरोप द्या…”

“खरंच… छावा आहे—सिंहाचा छावा!

आम्ही त्याचे डोळे काढले…
पण त्याची नजर झुकली नाही!

आम्ही त्याची जीभ कापली…
तरी दयेचे शब्द मागितले नाहीत!

हात तोडले—पण हात पसरले नाहीत!
पाय तोडले—पण गुडघे टेकले नाहीत!
मान छाटली—पण ती झुकली नाही!”

“या अल्लाह… आपण जिंकलो की हरलो?”

[गुडघ्यावर बसतो]

“या अल्लाह… रहम कर…”

[सरदार प्रवेश]

शहाबुद्दीन :
“पातशहा सलामत… चला हजरत…”

रुहुल्लाखान :
“हुजूर, सगळी फौज आपली वाट पाहते आहे.
फत्तेची मुबारकबात द्यायची आहे!”

हसनअलीखान :
“मराठे वतनदार, सरदार—सगळे आले आहेत…
आपली वाहवा करण्यासाठी!”

औरंगजेब :
“कशाला भेटायचं त्या लोकांना?
जे आपल्या राजाशी वफादार राहिले नाहीत—
ते आमच्याशी काय राहणार?”

“हाकलून द्या त्यांना!
आज जातील… उद्या पुन्हा येतील!”

इखलासखान :
“जहाँपन्हाँ… एक जरूरी काम आहे.”

हसनअलीखान :
“हुजूर… कित्येक वर्षे आपण ताज घातला नाही.
संभाजीचा अंत केल्याशिवाय ताज न घालण्याची शपथ घेतली होती.”

“आज तो दिवस आला आहे!”

[क्षणभर शांतता]

औरंगजेब :
“अरे… कसला जल्लोष करता आहात?

मारणारा हरला आहे…
आणि जो मेला—तो अमर झाला आहे!”

[नमाज]

औरंगजेब :
“या अल्लाह… रहम कर…”

[पार्श्वभूमी: संभाजींची सावली]

“जय भवानी… जय शिवाजी…!”

पडदा...

!! जय शंभूराजे !!

अखेर—राजा नसतानाही हा महाराष्ट्र तब्बल चौदा वर्षे औरंगजेबाशी झुंजत राहिला.
पण दिल्लीला परत जाण्याचं भाग्य औरंगजेबाच्या वाट्याला आलंच नाही!

छत्रपती संभाजी महाराज यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून
लाखो संभाजी, धनाजी, संताजी उभे राहिले…
आणि चौदा वर्षे लढत राहिले!

शेवटी—इथेच औरंगजेबाची कबर बांधली गेली…
आणि महाराष्ट्र शांत झाला—

पण ही शांतता होती **संभाजी राजांच्या बलिदानातून जन्मलेली प्रेरणा**…
त्यांच्या राष्ट्रप्रेमाची… त्यांच्या राष्ट्रभक्तीची!

जय शंभूराजे!

— **समाप्त** —

ऐतिहासिक संदर्भ (संक्षेप)

छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून राजगडावर पोहोचले.
रांगणा गडावरील वेढा उठवण्यासाठी ते ११ एप्रिल १६६७ रोजी या भागात दाखल झाले.



किल्ले "मनोहर मन संतोषगड"

शिवापूर